जुने विद्यार्थी व शिक्षकांचा वर्ग पुन्हा एकदा भरला. यावेळी अनेक उच्चपदस्थ माजी विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी अध्यक्षपदावरुन बोलताना माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थी जगाच्या स्पर्धेत टिकला पाहिजे. त्यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा पुरविण्यास संस्था बांधील आहे. येत्या काळात दहिगाव ने येथे चार एकरात संस्थेची भव्य वास्तू उभारण्याचा संकल्प आहे. माजी विद्यार्थ्यांचा मेळावा हे कल्पक विचार मांडण्याचे एक मोठे व्यासपीठ असून यापुढेही असे कार्यक्रम आयोजित व्हावेत. आपल्याकडील ज्ञानाची देवाण घेवाण केली तर अपेक्षित प्रगती साधण्यासाठी योग्य दिशा व मार्गदर्शन मिळते. जिल्हा परिषद उपाध्यक्षा राजश्री घुले, माजी आमदार चंद्रशेखर घुले, सरपंच सुभाष पवार, उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे, माजी सभापती त्रिंबक जाधव, प्राचार्य व्ही. एस. मरकड, उपप्राचार्य गोरक्ष ठोंबळ, प्रा. अनंत पाठक, साहेबराव दहातोंडे, सावळेहरी पवार, शब्बीर शेख, रामनाथ राठी, रमाकांत दहातोंडे, खंडेराव उंदरे, रायभान उंदरे, एम. बी. काळे, अंबादास फोलाणे, प्रा.मच्छिंद्र शेजूळ, आशा कर्डिले, संभाजी मुरकुटे, डॉ. सुशील कबाडी, प्रा. अमोल घुले, बेबीताई गायकवाड, भरत घोडके, सुरेश घानमोडे, जयराम नीळ आदींसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

लोकमत




# अपंग शाळांतील २४६४ पदांना मान्यता

## अनुदान देण्याच्या निर्णयानंतर पदनिर्मिती आवश्यक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्यातील शासनाच्या खासगी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या विनाअनुदानित तत्त्वावरील अपंगांच्या १२१ शाळेच्या पदनिर्मितीस राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यानुसार या शाळेसाठी २,४६४ नवीन पदे निर्माण करण्यास राज्य शासनाने मान्यता देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे अपंग शाळेला आता नवसंजीवनी येण्याची चिन्हे आहेत. राज्यात अनुदानित व विनाअनुदानित तत्त्वावरील अपंगांच्या विशेष निवासी व अनिवासी १२१ शाळा आहेत.

केंद्र शासनाच्या अपंग व्यक्त हक्क अधिनियम, २०१६ च्या तरतुदी विचारात घेऊन पुणे अपंग कल्याण आयुक्तांनी अपंग विद्यार्थ्यांना सर्वसाधारण विद्यार्थ्यांबरोबर शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कालबद्ध बृहत आराखडा तयार करावा. त्यानुसार अंमलबजावणीची कार्यवाही करावी, असेही शासनाने यासंदर्भात नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

आकृतिबंधानुसार ही पदनिर्मितीस मान्यता मिळाली आहे. त्यामुळे पद भरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अपंग शाळांसाठी अडीच हजार पदे भरण्यात येणार असल्याचे, अपंग शाळेला चांगले दिवस येण्याचे संकेत मिळत आहेत. **या शाळेसाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, कार्यालयीन विभाग, वसतिगृह विभाग, कर्मशाळा विभागांसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात पदनिर्मिती होत आहे ही बाब स्वागतार्ह म्हणावी लागले, असा सूर शिक्षणतज्ज्ञांमध्ये आहे.**

या शाळांना अनुदान देण्याचा निर्णय ८ एप्रिल २००५ रोजी घेण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर या शाळांसाठी पदनिर्मिती करणे आवश्यक होते.

त्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात शाळेतील सर्व पदांना मान्यता देण्यात आली आहे.

दैनिक दिव्य मराठी
12-Nov-2018
औरंगाबाद Page 8



**मंडे पॉझिटिव्ह** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या कबड्डी संघातील स्नेहल खंडागळे, सुवर्णा लोखंडेचा प्रेरणादायी प्रवास

# दुर्दैवाने दोघींचेही आई-वडिलांचे छत्र हरवले; त्यांच्या स्वप्नपूर्तीसाठी 'बोनस' कामगिरी; आयपीएस व आंतरराष्ट्रीय खेळाडूसाठी धडपड!

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संघाचा दुसरा विजय

एकनाथ पाठक | औरंगाबाद

स्वर्गीय वडिलांच्या स्वप्नपूर्तीसाठी राष्ट्रीय खेळाडू स्नेहल खंडागळे व सुवर्णा लोखंडे सध्या कबड्डीच्या मैदानावर बोनस कामगिरी करत आहेत. मैदानावरच्या याच कामगिरीसह त्यांची करिअरमध्ये यशाचा मोठा पल्ला गाठण्यासाठीची धडपड कौतुकास्पद ठरली. आयपीएस अधिकारी होण्यासाठी स्नेहल व आंतरराष्ट्रीय खेळाडू होण्यासाठी सुवर्णा मेहनत घेत आहे. त्यांचे ही मेहनत प्रेरणादायी आहे.

**संघाच्या दुसऱ्या विजयात मोलाचे योगदान :** लातूर येथील पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत रविवारी औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संघाने संघाने सलग दुसरा विजय संपादन केला. स्नेहल खंडागळे आणि सुवर्णा लोखंडेच्या अव्वल कामगिरीच्या बळावर संघाने सामन्यात गुजरातच्या नर्मदा विद्यापीठ संघाचा ४९-२४ अशा फरकाने पराभव केला. हा टीमचा दुसरा विजय ठरला. यापूर्वी या संघाने सलामीला जुनागड टीमलाही पराभूत केले होते. आता टीमला आज सोमवारी विजयी हॅट्‌ट्रिकची संधी आहे. या संघाचा तिसरा सामना गुजरातच्या विद्यापीठ संघाशी होईल.



**बालपणीच्या मैत्रिणींचा राष्ट्रीय स्पर्धेत दबदबा; तीन वेळा राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग**

स्नेहल आणि सुवर्णा या दोघीही शेवगाव तालुक्यातील (जि.अहमदनगर) दहिगावणे गावात राहतात. त्यांना वडिलांचे मार्गदर्शन लाभले व दोघी कबड्डी स्पर्धा गाजवू लागल्या. याच मार्गदर्शनाला मेहनतीची जोड मिळाली आणि त्यांनी स्कूल नॅशनल स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. या दोघीही प्रत्येकी तीन वेळा राष्ट्रीय स्पर्धा खेळल्या आहेत.

## आई-वडिलांनी पाहिलेल्या स्वप्नपूर्तीचा आता ध्यास

अभ्यासासह मैदानावर प्रचंड प्रतिभावंत खेळाडू म्हणून ओळख निर्माण करणाऱ्या या दोघींच्या बाबतीत दुर्दैवाने एक गोष्ट सारखीच घडली. स्नेहल आणि सुवर्णांच्या डोक्यावरचे आई-वडिलांचे छत्र हरवले. स्नेहलचे वडील बाळासाहेब खंडागळे यांचे गत आठ महिन्यांपूर्वी निधन झाले. तिची आईही त्यापूर्वीच वारली होती. हेच सुवर्णाच्या बाबतीतही घडले. मात्र, त्यांनी पोरके झाल्याची खंत नाही. वडिलांच्या मोठे अधिकारी होण्याच्या स्वप्नपूर्तीसाठीच त्या दोघीही प्रचंड मेहनत करत आहेत. त्या देवगिरी कॉलेजमध्ये शिकत आहेत.

# वेस्ट झोन कबड्डी स्पर्धेत स्नेहल, सुवर्णाची चमक

### स्वतःची स्पोर्ट्स अकादमी काढणार



करिअरमध्ये मोठ्या हुद्द्यावर नोकरी करण्याचे माझे स्वप्न आहे. यासाठी मी स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. याच स्वप्नपूर्तीनंतर खेळातील आपली आवड जपण्याचाही माझा प्रयत्न असेल. याच यशानंतर मी स्वतःची अशी गावात स्पोर्ट्स अकादमी काढणार आहे; जेणेकरून गावातील महिला खेळाडूंना याचा फायदा होईल, असे स्नेहल म्हणाली.

### देशाकडून आंतरराष्ट्रीय सामने गाजवणार



मराठमोळ्या कबड्डीला आता जागतिक स्तरावर नवीन ओळख मिळाली आहे. त्यामुळे भारताचे आणि खासकरून महाराष्ट्राचे खेळाडू आपली चमक दाखवत आहेत. मलाही असाच आंतरराष्ट्रीय खेळाडू होऊन जागतिक स्तरावरील सामने गाजवायचे आहे, असे सुवर्णाने सांगितले.

# नवोदित लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले - घुले

बक्करपूर (वार्ताहर) – जिल्हास्तरीय खुल्या निबंध स्पर्धा ग्रामीण पत्रकार संघाने आयोजित करून नवोदित लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. स्पर्धा परीक्षेत अपयश आले तरी खचून न जाता ज्या-ज्या ठिकाणी संधी उपलब्ध होईल, त्या ठिकाणी स्पर्धेत सहभागी झाले पाहिजे एक ना एक दिवस यश मिळाल्याशिवाय राहत नाही, असे प्रतिपादन माजी आ. चंद्रशेखर घुले यांनी केले.



महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघ, शेवगाव आयोजित जिल्हास्तरीय आदर्श पुरस्कार वितरण समारंभात मार्गदर्शन करताना माजी आ. चंद्रशेखर घुले. (छाया – सोपान जाधव)

शेवगाव तालुका महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघाच्यावतीने जिल्हास्तरीय खुल्या निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण सोहळा काल रविवारी दहिगांव-ने येथील अक्षय अक्षदा लॉन्समध्ये पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषी व पशुसंवर्धन समितीचे माजी सभापती दिलीपराव लांडे, सभापती क्षितीज घुले, कृष्णदेव महाराज काळे, शिवशाहीर कल्याण महाराज काळे, भारुड सम्राट हमीद सय्यद, ताहेर पटेल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष ॲड. अनिल मडके, संजय कोळगे, नायब तहसीलदार भानुदास गुंजाळ उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर याच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. निबंध स्पर्धेतील विजेते संदिप चाकणे (श्रीगोंदे) प्रथम क्रमांक, राहुल वडणे (भातकुडगाव ) द्वितीय क्रमांक, भारती थोरात (ढोरजळगाव) तृतीय क्रमांक तर उत्तेजनार्थ – सविता धायतडक (पाथर्डी) या स्पर्धकांना अनुक्रमे ५००, ३००, २००, १०० रुपये रोख, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आले. तसेच पत्रकार दिनानिमित्त ग्रामीण पत्रकारांचा गौरव दहिगांव -ने येथील जनता प्रसारक मंडळाच्या व लोकजागर फौंडेशन भातकुडगांव यांच्यावतीने सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ, गुलाब पुष्प देवून सन्मान सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामीण पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बाळासाहेब जाधव, सूत्रसंचालन सिंकदर शेख, बाळासाहेब पानकर यांनी केले तर पत्रकार संघटनेचे उपाध्यक्ष किरण तहकिक यांनी आभार मानले. यावेळी परिसरातील विविध संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विस्तार अधिकारी रामकिसन जाधव, विलास लोखंडे, आप्पासाहेब खंडागळे, प्रा. महेश शेजूळ, चेतन गर्जे, जिल्हा कार्याध्यक्ष दीपक खोसे, ता.सरचिटणीस शंकर मरकड, सलीम शेख, ईश्वर वाघमारे, उद्धव देशमुख, रामनाथ रूईकर, इसाक शेख, किरण तहकिक, संजय भालेकर, सागर पाटील, सोपान जाधव, शिवाजी खरड, रमेश खैरे, अशोक वाघ, सुनील रनमले, गणेश शिंदे,बाळासाहेब वाघ, सचिन दसपुते, सुनील नजन, संतोष सोनवणे प्रयत्नशील होते.

▶ पत्रकाराच्या लेखनीमध्ये इतकी ताकद आहे की सर्व क्षेत्रावर त्यांचा अंकुश आहे. सोशल मिडीयाच्या जमान्यात अजूनही प्रिंट मीडिया तग धरून आहे.ग्रामीण पत्रकार संघाचे उपक्रम कौतुकास्पद आहे. ग्रामीण भागात अशा कार्यक्रमामुळे उत्साह निर्माण होतो. असे उपक्रम राबविने महत्त्वाचे आहे. मूल व चूल ही तत्व महिलेने मागे टाकत पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. शासनाने महिलांना पन्नास टक्के आरक्षण जाहीर केले आहे. ग्रामीण संटनेनेही निबंध स्पर्धेत हा नियम पाळला असून विद्यार्थ्यांनी स्पर्धा परिक्षेत सहभागी झाले पाहिजे. असे आवाहन कृषी पशु संवर्धन समितीचे माजी सभापती दिलीपराव लांडे यांनी केले.

दैनिक सार्वमत,पत्रकार बाळासाहेब जाधव

# घुले महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर उत्साहात

**भावीनिमगाव/प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व लोकनेते मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालय दहिगाव-ने ता.शेवगाव व जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय भेंडे यांच्या संयुक्त विद्यमाने शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर पार पडले.

यशस्वी जीवनसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीद तरुणांनी अंगिकारावे असे प्रतिपादन शेवगाव पंचायत समितिचे सभापती डॉ.क्षितिज घुले यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. ज्ञानेश्वर कारखान्याचे संचालक देसाई देशमुख कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी जि.प.सदस्य रामभाऊ साळवे, प्रा.डॉ.बी. जे.अप्पाराव, प्रा.डॉ.डी.एन.वाबळे, आदिसह ग्रामस्थ, पदाधिकारी उपस्थित होते. दि. २७ डिसेंबर ते २ जानेवारी या कालावधीत समर्थ भारत अभियान व सक्षम युवा समर्थ भारत या उपक्रमांतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात एकूण १५० स्वयंसेवक सहभागी झाले होते. या सात दिवसाच्या शिबिरामध्ये ग्रामस्वच्छता गाव इतिहास लेखन, ग्रामसर्वेक्षण, आरोग्य केंद्राचे सुशोभिकरण इ.विधायक व सामाजिक उपक्रमाचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले. तसेच स्वयंसेवकांसाठी तज्ञाची विविध विषयावरची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. यावेळी प्रियंका मरकड, प्रियंका चाबुकस्वार, मुख्तार शेख, शुभम घोडेचोर या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.शिबिर यशस्वितेसाठी प्रा.डॉ. निलेश खरात, प्रा.डॉ.रामदास आर्ले, प्रा.डॉ.संजय महेर उपस्थित होते.

लोकमंथन Mon, 07 January 2019
https://www.readwhere.com/read/c/35550451
पत्रकार शंकर मरकड न्यूज

nagartimes pdf...

# तळागाळातील प्रश्नांची उकल पत्रकाराकडून होते

## डॉ. क्षितीज घुले ■ आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान



■ महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघ, शेवगाव आयोजित जिल्हास्तरीय आदर्श पुरस्कार पुरस्कार दैनिक सार्वमतचे उपसंपादक जी. एन. शेख (जहागीरदार) यांना प्रदान करताना बाजार समितीचे सभापती क्षितीज घुले, अध्यक्ष ॲड. अनिल मडके, पत्रकार शंकर मरकड, सलीम शेख आदी.

अहमदनगर (प्रतिनिधी) – शासनाच्या विविध योजनांबाबत वृत्तपत्राच्या माध्यमातून जनजागृती होते. तळागाळातील प्रश्नांची उकल पत्रकार करत असतात. सर्वसामान्य जनतेची व शेतकरी प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपले मोठे योगदान देणारे पत्रकार नेहमीच सन्मानास पात्र असतात, असे गौरवोद्गार शेवगाव पंचायत समिती सभापती डॉ. क्षितीज घुले यांनी बोलताना व्यक्त केले. यावेळी दैनिक सार्वमतचे उपसंपादक जी. एन. शेख (जहागीरदार) यांना डॉ. घुले यांच्या हस्ते जिल्हास्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आला. शेवगाव तालुका महाराष्ट्र राज्य ग्रामीण पत्रकार संघाच्यावतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणार्या दहा व्यक्तींना जिल्हास्तरीय आदर्श पुरस्कार प्रदान समारंभ दहिगांव- ने येथे पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्ञानेश्वर कारखान्याचे अध्यक्ष चंद्रशेखर घुले होते. प्रमुख पाहुणे म्हणून कृषी व पशु संवर्धन समितीचे माजी सभापती दिलीपराव लांडे, कृष्णदेव महाराज काळे, शिवशाहीर कल्याण महाराज काळे, भारुड सम्राट हमीद सय्यद, ताहेर पटेल, कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष ॲड. अनिल मडके, संजय कोळगे, नायब तहसीलदार भानुदास गुंजाळ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर याच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक ग्रामीण पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव, सुत्रसंचालन सिंकदर शेख, बाळासाहेब पानकर यांनी केले. उपाध्यक्ष किरण तहकिक यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विस्तार अधिकारी रामकिसन जाधव, विलास लोखंडे, आप्पासाहेब खंडागळे, प्रा. महेश शेजूळ, चेतन गर्जे, जिल्हा कार्याध्यक्ष दिपक खोसे, तालुका सरचिटणीस शंकर मरकड, सलीम शेख, ईश्वर वाघमारे, उद्धव देशमुख, रामनाथ रुईकर, इसाक शेख, किरण तहकिक, संजय भालेकर, सागर पाटील, सोपान जाधव, शिवाजी खरड, रमेश खैरे, अशोक वाघ,सुनिल रनमले, गणेश शिंदे, बाळासाहेब वाघ, सचिन दसपुते, सुनील नजन, संतोष सोनवणे प्रयत्नशील होते.

प्रासंगिक

# विवेकयुगाचे अमृतमंथन

श्री. सदाशिव अत्तरकार, बुलडाणा

**स्वामी विवेकानंदांचे विचार हे बावनकशी सोन्याप्रमाणे तेजस्वी बनलेले होते. पाश्चात्त्य वसाहतवादी शिक्षणाचा स्वीकार न करता त्यांनी आपले मूलगामी विचार मांडले. त्यांनी नवभारताच्या उभारणीसाठी शिक्षणाच्या माध्यमातून नवी संजीवनी दिली. त्यांचे शैक्षणिक विचार भारताला समर्थ व संपन्न राष्ट्र बनविण्यासाठी पथदर्शक ठरणारे होते.**



स्वामी विवेकानंद हे दूरदृष्टीचे भारतीय तत्त्वज्ञ होते. त्यांनी भारतीय संस्कृतीचा जगभर प्रसार केला. भारतीय समाजापुढे अनेक जिवंत प्रश्नांची त्यांनी यथार्थ चर्चा केली होती. शिक्षण हे त्यांच्या प्रतिभाशाली चिंतनाचे एक मौलिक क्षेत्र होते. माणसातील माणूसपण जागविणारे शिक्षण हवे, असे त्यांचे मत होते. शिक्षण म्हणजे माणसाच्या आत्म्यातील प्रकाश त्याला पुन्हा प्राप्त करून देण्याची प्रक्रिया होय, असे त्यांचे मत होते. गुरू आणि शिष्य हे दोन ध्रुवांवर असतील, तर त्यांच्यात संवाद कसा होणार. शिक्षक हा शिस्तप्रिय, क्षमाशील व कतर्व्यनिष्ठ असावा. आदर्श सेवाभावी आणि सहृदय शिक्षक हा राष्ट्राचा शिल्पकार बनू शकतो, असे त्यांचे मत होते. त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्र निर्मितीची प्रक्रिया गतिमान केली. २१ व्या शतकात नवभारताची उभारणी करण्यासाठी स्वामी विवेकानंदांचे विचार प्रेरक ठरणारे आहेत.

**शिक्षणाचा खरा अर्थ**

शिक्षण म्हणजे काय केवळ पुस्तके नव्हेत, विविध ज्ञानाचा संग्रह नव्हे. स्वामी विवेकानंद म्हणतात, 'ज्या प्रशिक्षणामुळे वर्तमान आणि आविष्काराची अभिव्यक्ती नियंत्रणात आणली जाते आणि फलदायी बनते त्याला शिक्षण म्हणतात.' याचा अर्थ असा, की स्वामी विवेकानंदांना शिक्षणातून कल्पकता व सर्जनशीलता अभिप्रेत होती. तेजस्वी, ध्येयवादी आणि पोलादी मनगटाचा जागृत युवक अशा बलशाली राष्ट्राचा आधार होय, असे त्यांचे मत होते. अशा ध्येयप्राप्तीसाठी तरुणांनी निर्धाराने व निश्चयाने अखंडपणे चालत राहावे, जोपर्यंत आपले ध्येय साध्य होत नाही, तोपर्यंत मार्गक्रमण करत राहावे, अशी त्यांची भूमिका होती. तरुणांसमोर ध्येयवादी व चारित्र्यसंपन्न जीवनाचा आदर्श ठेवला होता. कला व क्रीडा संस्कारातून तरुणांचे जीवन घडते.

**नैतिक व आध्यात्मिक स्रोत**

शिक्षण म्हणजे एक अखंडपणे वाहणारा नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा स्रोत होय. नदी अखंडपणे वाहते व मागे वाळू बरोबर सोन्याचे कण ठेवते, तसे भारतीय परंपरेने शिक्षणाचे संस्कार मूल्य जोपासले आहे; परंतु वर्तमानकाळात भारतीय शिक्षणातील समस्यांची समस्या कोणती असेल, तर ती नैतिक व आध्यात्मिक होय. स्वामी विवेकानंद म्हणत, लोकांना शिक्षित करा, त्यांचे जीवन संस्कार प्रक्रियेतून वाढवा. त्यातून एक नवे राष्ट्र उभे राहू शकेल. अशा प्रकारे शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी शाश्वत विकासाचा मंत्र दिला.

आपल्या शैक्षणिक संस्था व विद्यापीठे ज्ञान निर्मितीची केंद्रे व्हावीत, असा त्यांचा आग्रह होता. चांगले आदर्श शिक्षक विद्यार्थ्यांवर नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचा संस्कार करू शकतात, असे त्याचे मत होते.

**शिक्षण आणि दारिद्र्य निर्मूलन**

गोरगरिबांना आपण हजारो वर्षे शिक्षणापासून वंचित ठेवले, याची त्यांना खंत वाटत होती. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी शिक्षणामुळे सामर्थ्य प्राप्त व्हावे, अशी त्यांची धारणा होती. आपल्या देशातील गरीब मुलांचे हाल पाहून व त्यांची युरोप-अमेरिकेशी तुलना करून त्यांच्या डोळ्यांत अश्रू वाहत असत. राष्ट्र उद्धारासाठी सर्व स्तरांतील लोकांना शिक्षित करणे हे प्रथम कर्तव्य आहे. स्त्री-पुरुष समानता ही नव्या युगाची हाक आहे. शिक्षणाने महिलांचे जीवन समर्थ बनले पाहिजे, असे त्यांना वाटत होते. स्वामीजी म्हणतात, मन एकाग्र करून केलेली ज्ञानसाधना गोवर्धन पर्वत उचलण्यासाठी सामर्थ्य देते. जीवनातील अनेक वादळांना, संकटांना शिक्षणाआधारे सामोरे जाता येते. विवेकानंदांच्या मते, शिक्षणाच्या माध्यमातून नकारात्मक भावना जोपासली जाता कामा नये. श्रमप्रतिष्ठा व आत्मसन्मान हे स्वामी विवेकानंदांचे विचार महात्मा गांधींनी त्यांच्या 'नई तालीम' या शैक्षणिक प्रणालीत घेतलेले दिसतात.

**चारित्र्य निर्माणाचे आव्हान**

भारतामध्ये वर्तमान काळात सर्वात मोठे आव्हान कोणते असेल, तर चारित्र्य निर्मितीचे आहे. ज्याचे चारित्र्य तेजस्वी अग्नीसारखे आहे, असा तरुणवर्ग शिक्षणातून उभा राहावा, अशी त्यांची अपेक्षा होती. ज्ञान म्हणजे सद्गुण. जर ज्ञान मिळविता येते, तर सद्गुणांचीही जोपासना करता आला पाहिजे, अशी त्यांची श्रद्धा होती.

संत नामदेवांनी म्हटल्याप्रमाणे 'नाचू किर्तनांचे अंगी, ज्ञानदीप लावू जगी,' असा विश्वास प्रबळ शिक्षणाच्या माध्यमातून निर्माण होईल, असे त्यांना वाटत होते. स्वामी विवेकानंदांना मानवी जीवनातील यशासाठी ज्ञान, चारित्र्य व एकता या त्रिसूत्रीची सत्यता पटली होती. चारित्र्याशिवाय ज्ञान व्यर्थ आहे व ऐक्याशिवाय कोणतेही राष्ट्र भूतलावर समर्थपणे उभे राहू शकत नाही, याची त्यांना खात्री पटली होती.

**समारोप**

गीता हा एक मौलिक संवाद आहे आणि वेद म्हणजे ईश्वरीय कल्पनांची अभिव्यक्ती आहे. वेदांमध्ये अभिजात शिक्षणाचा आविष्कार घडविला आहे. इंग्रजी शिक्षणाने ग्रंथ वाचण्यास शिकविले; पण माणूस निर्माण केला नाही, याची त्यांना खंत वाटते. शिक्षण आणि धर्म यातील यथार्थ नाते त्यांनी जाणले होते. जीवनाच्या सर्व पातळींवरील श्रद्धाभाव जोपासला असता, तर समाज व राष्ट्र उन्नतीकडे झेपावू शकेल, असा त्यांचा मानस होता. नवभारताच्या उभारणीसाठी त्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून नवी संजीवनी दिली. आपल्याला अध्ययन, अध्यापन, संशोधन व विस्तार या चारही क्षेत्रांत नवी उंची गाठण्यासाठी त्यांचे शैक्षणिक विचार अनुसरले पाहिजेत.

**- प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर**

# स्व.मारूतराव घुले हेच माझे आदर्श : डॉ.घुले



**पुण्यनगरी वृत्तसंस्था**
**निंबेनांदूर / प्रतिनिधीः**

शेवगाव - नेवासा तालुक्याचे भाग्यविधाते, सहकार क्षेत्रातील विकासाचा महामेरू, लोकनेते स्व.मारूतराव घुले पाटील यांच्या समाजकार्याचा आदर्श माझ्यासमोर आहे. सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून सभापतीपदाच्या संधीचे सोने सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी करीन, असे प्रतिपादन शेवगाव पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितीज घुले यांनी केले.

वाघोली येथे डॉ.घुले यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. डॉ.घुले म्हणाले, मी उच्च शिक्षण घेवून नोकरी केली. परंतु, समाजाचं भलं व्हावं, असा विचार मनात आल्यानंतर मी समाजकार्य सुरू केले. मी सभापती झाल्यानंतर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या. रक्तदान जीवनदान असून या उपक्रमाने समाजाचे भले होईल. पंचक्रोशीतील वाघोली, वडुले खुर्द, निंबेनांदूर, आव्हाणे बुद्रुक, भातकुडगाव, ढोरजळगाव या गावांतील कार्यकर्त्यांनी मला खूप प्रेम दिले. युवक राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, बाजार समितीचे सभापती अॅड. अनिल मडके, अॅड. गोरक्षनाथ जमधडे, दिनकर फुंदे, शेवगाव दुध संघाचे माजी चेअरमन भरत वांढेकर, सुधीर शिरसाठ, गणेश भालसिंग, ज्ञानेश्वर कळकुटे, पाथर्डीचे नगरसेवक महेश बोरूडे यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी उपसभापती शिवाजीराव नेमाणे, वडुले बुद्रुकचे सरपंच प्रदिप काळे, बबन भुसारी, अंबादास कळमकर, डॉ. सुधाकर लांडे, राजेंद्र देशमुख, खरेदी विक्री संघाचे संचालक बाळासाहेब जाधव, मकरंद बारगुजे, आप्पासाहेब खंडागळे, युवक राष्ट्रवादीचे युवा कार्यकर्ते अजय नजन, विष्णू सातपुते, चंद्रकांत मरकड, अशोक जमधडे, बंडू अकोलकर, टीडीओ भाऊसाहेब चेके, शहादेव खोसे, दिलीप भालसिंग, कृष्णा सातपुते, रोहन साबळे, मधुकर चौधर, केशवराव जमधडे, रावसाहेब शिंगटे, ब्लड बँकिचे डॉ. सुनील महानोर, पांडुरंग नागरे, नवनाथ बुवा आव्हाड, विष्णूपंत आव्हाड, प्रदिप वांढेकर, अजय गाडगे, किसन वांढेकर, प्रकाश वांढेकर, प्रा., नरवडे, भगवान वांढेकर, राहूल फुंदे, बाळासाहेब शिरसाठ, साईराम शिंगटे, गोटीराम दातीर, श्रीकांत आव्हाड, ऋषीकेश शेळके, भरत गाडगे, राम जमधडे, अतुल शिंगटे, महेश कळकुटे, अक्षय शिंगटे, विशाल कळकुटे, किरण शिंगटे, सुहास भालसिंग, आकाश वांढेकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन संजय भुसारी यांनी केले. प्रास्ताविक करून संकेत वांढेकर यांनी आभार मानले.

लोकमत



वाघोली (ता. शेवगाव ) येथे पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितिज घुले यांच्या वाढदिवसानिमित्त शिबिरात रक्तदान करताना युवक.

# डॉ. क्षितिज घुलेंच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

भातकुडगाव : पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितिज घुले यांच्या वाढदिवसानिमित्त वाघोली (ता. शेवगाव) येथील राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत रक्तदान शिबिर घेण्यात आले.

लोकनेते स्व. मारुतराव घुले पाटील यांच्या समाजकार्याच्या आदर्शानुसार आपली वाटचाल सुरु आहे. सभापतीपदाच्या माध्यमातून सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. रक्तदान म्हणजे जीवनदान असून वाघोली येथील युवकांचा सामाजिक उपक्रम समाजोपयोगी आहे, असे डॉ. घुले यावेळी म्हणाले.

नगर येथील आनंदऋषी रक्तपेढीतील वैद्यकिय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी यावेळी रक्तदात्यांचे रक्तसंकलन केले. यावेळी युवक राष्ट्रवादीचे जिल्हा कार्याध्यक्ष संजय कोळगे, उपसभापती शिवाजी नेमाणे, बाजार समितीचे सभापती अ‍ॅड. अनिल मडके, जि. प. सदस्य रामभाऊ साळवे, पं. स. सदस्य मंगेश थोरात, टीडीओ भाऊसाहेब चेके, अ‍ॅड. गोरक्षनाथ जमधडे, दिनकर फुंदे, भरत वांढेकर, पाथर्डीचे नगरसेवक महेश बोरुडे, वडुले बुद्रूकचे सरपंच प्रदीप काळे, डॉ. सुधाकर लांडे, राजेंद्र देशमुख, 'खविसं'चे संचालक बाळासाहेब जाधव, मकरंद बारगुजे, आप्पासाहेब खंडागळे, अजय नजन, बंडू अकोलकर, संजय भुसारी आदी उपस्थित होते.

संजय भालेकर, लोकमत प्रतिनिधी

स्तरासाठी निवड केली जात. प्रत्येक

# घुले महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्रास प्रतिसाद



**पुण्यनगरी वृत्तसंस्था /दहिगाव ने :**
सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ व दहिगाव ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या मराठी भाषा विभागाच्या विद्यमाने आयोजित 'आधुनिक मराठी साहित्य : स्वरूप आणि प्रकार' या विषयावरील दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्रास चांगला प्रतिसाद मिळाला. समारोपाच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भिगवन, ता. इंदापूर येथील कला महाविद्यालय प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.डी. एन. वाबळे होते. व्यासपीठावर प्रशासकीय अधिकारी के. के. पवार, प्रा.डॉ. शिरीश लांडगे, अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ पुणे, प्राचार्य. डॉ. अशोक शिंदे, प्रा. डॉ. महेबूब सय्यद, उप. प्रा. संभाजी काळे, प्राचार्य विष्णू मरकड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे यांच्या हस्ते करण्यात आले होते. या चर्चासत्रात मराठी भाषा साहित्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड आवश्यक असल्याचे सत्र अध्यक्षांनी व्यक्त केले मत. दोन दिवसांच्या चर्चासत्रात प्रा. डॉ. चंद्रकांत जोशी, प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर, प्रा. डॉ. संदीप सांगळे, प्रा. डॉ. एन. डी. चौधरी, प्रा. डॉ. सुधाकर शेलार, यांच्या अध्यक्षतेखाली विविध शोधनिबंधकांनी आपल्या निबंधाचे वाचन केले. कार्यक्रमीसाठी प्राचार्य डॉ. किसन पिसाळ, प्राचार्य डॉ डि. एन वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. निलेश खरात व समन्वयक प्रा. अमोल गुंड, यांचेसह प्रा. महेश शेजुळ, प्रा. आप्पासाहेब खंडागळे, प्रा. सुनिल वराट, प्रा. प्रविण आगळे, बाबासाहेब घुले, डॉ. राजेंद्र नाबदे, अमोल गायकवाड, प्रवीण केसभट, श्रीराम देशपांडे, अरविंद शिंदे, सुनिता ढगे, रविंद्र गायकवाड, बाळासाहेब साबळे यांनी परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिपक देवकर, अश्विनी देशमुख यांनी केले तरआभार मराठी विभाग प्रमुख प्रा. निलेश खरात यांनी व्यक्त केले.

पुण्यनगरी दि.4 फेब्रुवारी 19

# घुले महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्रास प्रतिसाद

पत्रकार अशोक वाघ



**पुण्यनगरी वृत्तसंस्था /दहिगाव ने :**

सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ व दहिगाव ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या मराठी भाषा विभागाच्या विद्यमाने आयोजित 'आधुनिक मराठी साहित्य : स्वरूप आणि प्रकार' या विषयावरील दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्रास चांगला प्रतिसाद मिळाला. समारोपाच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भिगवन, ता. इंदापूर येथील कला महाविद्यालय प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.डी. एन. वाबळे होते. व्यासपीठावर प्रशासकीय अधिकारी के. के. पवार, प्रा.डॉ. शिरीश लांडगे,अध्यक्ष मराठी अभ्यास मंडळ पुणे, प्राचार्य. डॉ. अशोक शिंदे, प्रा. डॉ. महेबूब सय्यद, उप. प्रा. संभाजी काळे, प्राचार्य विष्णू मरकड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे यांच्या हस्ते करण्यात आले होते. या चर्चासत्रात मराठी भाषा साहित्याला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड आवश्यक असल्याचे सत्र अध्यक्षांनी व्यक्त केले मत. दोन दिवसांच्या चर्चासत्रात प्रा. डॉ. चंद्रकांत जोशी, प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर, प्रा. डॉ. संदीप सांगळे, प्रा. डॉ. एन. डी. चौधरी, प्रा. डॉ. सुधाकर शेलार, यांच्या अध्यक्षतेखाली विविध शोधनिबंधकांनी आपल्या निबंधाचे वाचन केले. कार्यक्रमीसाठी प्राचार्य डॉ. किसन पिसाळ, प्राचार्य डॉ डि. एन वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. निलेश खरात व समन्वयक प्रा. अमोल गुंड, यांचेसह प्रा. महेश शेजुळ, प्रा. आप्पासाहेब खंडागळे, प्रा. सुनिल वराट, प्रा. प्रविण आगळे, बाबासाहेब घुले, डॉ. राजेंद्र नाबदे, अमोल गायकवाड, प्रवीण केसभट, श्रीराम देशपांडे, अरविंद शिंदे, सुनिता ढगे, रविंद्र गायकवाड, बाळासाहेब साबळे यांनी परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिपक देवकर, अश्विनी देशमुख यांनी केले तरआभार मराठी विभाग प्रमुख प्रा. निलेश खरात यांनी व्यक्त केले.

# जीवनाचा प्रवास साहित्यातून प्रकट होते- प्रा. डॉ. लांडगे



**शेवगाव, दि. ३ (प्रतिनिधी)-** चर्चासत्रात अनेक प्रश्नांची उकल तर होतेच पण काही नवीन प्रश्नही त्यानिमिताने समोर येत असतात. ते सोडविण्याची दिशा अशा चर्चासत्रातून मिळत असते, म्हणून ती होणे आवश्यक असल्याचे सांगून माणसाच्या जीवनाचा प्रवास कोणात्या दिशेने होतो. हे साहित्यातून उत्तमरित्या प्रकट होते, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिरिष लांडगे यांनी केले.

तालुक्यातील दहिगांव ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविदयालयात राज्यस्तरीय मराठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी समारोपाच्या कार्यक्रमप्रसंगी डॉ. लांडगे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. डी. एन. वाबळे होते. मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा.डॉ. आशोक शिंदे, अकलूज महाविघालयाचे प्राचार्य. डॉ.महादेव वाळुंज, महेबुब सय्यद, संभाजी काळे, निवृत्ती मिसाळ आदी उपस्थितीत होते. सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोंगटे यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन झाले.

प्रा.डॉ. आशोक शिंदे म्हणाले, प्रत्येक विदयार्थांच्या अंगी कला असणे गरजचे आहे. कला माणसाला जगायला शिकवते, त्यातुन रोजगाराचा प्रश्न सोडवण्यास मदत होईल. प्रा. डॉ. महेबुब सय्यद, प्रा.डॉ. प्रविण ताठे यांचीही भाषणे झाली. या राज्यस्तरीय चर्चासत्रासाठी आधुनिक मराठी साहित्य : स्वरूप आणि प्रकार हा विषय ठेवण्यात आला होता. यात राज्यातील ५० प्राध्यापक शिक्षकांनी शोधनिबंध सादर करून या चर्चासत्रात सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्राचार्य डॉ. के. आर. पिसाळ यांनी केले. सुत्रसंचलन प्रा. राजेंद्र नाबदे यांनी केले.चर्चासत्र यशस्वीतेसाठी मराठी विभागप्रमुख प्रा. निलेश खरात, प्रा. अमोल गुंड, प्रा. महेश शेजुळ,बाबासाहेब घुले, प्रवीण केसभट, श्रीराम देशपांडे, अरविंद शिंदे, अश्विनी देशमुख, सुनिता ढगे बाळासाहेब साबळे आर्दिनी परिश्रम घेतले.

प्रभात Mon, 04 February 2019
epaper.eprabhat.net/c/36388420

# निर्माण झालेल्या प्रश्नांना चर्चासत्रातून उत्तर मिळते : डॉ. लांडगे

लोकवेध । प्रतिनिधी



**दहिगावने** : चर्चासत्र हे नवीन प्रश्नाला जन्म घालत असतात तर काही प्रश्नाचे उत्तर देत असतात. माणसाच्या जीवनाचा प्रवास कोणात्या दिशने जातो यासाठी साहित्य व चारित्र्य यांचा तुलनात्मक अभ्यास केल्यास साहित्याचे खरे स्वरूप कळते, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विषय अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिरिष लांडगे यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील दहिगावने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात राज्यस्तरीय मराठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी डॉ. लांडगे बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. डी. एन. बाबळे होते. यावेळी मराठी अभ्यास मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. अशोक शिंदे, प्रा. डॉ. महादेव वाळुंज, महेबुब सय्यद, संभाजी काळे, निवृत्ती मिसाळ, आदी उपस्थितीत होते.

या चर्चासत्राचे उद्‌घाटन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. तुकाराम रोगटे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. डॉ. अशोक शिंदे, प्रा. डॉ. महेबुब सय्यद, प्रा. डॉ. प्रविण ताठे यांनी मनोगत व्यक्त केले.

या राज्यस्तरीय चर्चासत्रासाठी आधुनिक मराठी साहित्य : स्वरूप आणि प्रकार हा विषय ठेवण्यात आला होता. यात राज्यातील ५० प्राध्यापकांनी शोधनिबंध सादर करुन चर्चासत्रात सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. के. आर. पिसाळ यांनी केले. सूत्रसंचलन प्रा. राजेंद्र नाबदे यांनी केले तर प्रा. अशोक गुंड यांनी आभार मानले. चर्चासत्र यशस्वीतेसाठी मराठी विभागप्रमुख प्रा. निलेश खरात, प्रा. आप्पासाहेब खंडागळे, प्रा. महेश शेजुळ व महाविद्यालयातील शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# अपंगांना मिळणार दरमहा निर्वाह भत्ता

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून अपंग कल्याण निधीतून अपंग व्यक्तींना निर्वाह भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १८ वर्षे आणि त्या पुढील ७० टक्क्यांपेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तींना दरमहा एक हजार रुपये याप्रमाणे वर्षाला १२ हजार रुपयांचा भत्ता देण्यात येणार आहे. बहुविकलांग, दिव्यांग, मतिमंद, अंध आणि मूकबधिरांना या निर्णयाचा लाभ होणार आहे. या योजनेसाठी जिल्ह्यातून अर्ज मागविण्यात आले आहेत.

दरम्यान, जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकात अपंगांसाठी ३ टक्के निधीची तरतूद करण्यात आली आहे. परंतु, ही तरतूद वाढविण्यात आली असून, ५ टक्के केली आहे. त्यामुळे निधी वाढला असून, जास्तीत जास्त अपंगांना लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

२०१८-१९ या वर्षात जिल्ह्यातील आंबेगाव, बारामती, दौंड, इंदापूर, खेड, मावळ, पुरंदर, शिरूर आणि वेल्हे तालुक्यातील ९१९ लाभार्थ्यांना दरमहा एक हजार रुपये निर्वाह भत्ता देण्यात आला आहे. अन्य तालुक्यातील अर्जदारांच्या प्रस्तावाची छाननी सुरू आहे. त्यानुसार लाभार्थ्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे. ९१९ लाभार्थ्यांसाठी आतापर्यंत एका वर्षात १ कोटी १० लाख २८ हजार रुपयांचे अनुदान डीबीटीद्वारे संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यासाठी पंचायत समितीकडे वर्ग करण्यात आले आहे, असे समाज कल्याण विभागाने सांगितले.

# आनंदी जीवनाची गुरुकिल्ली



एके ठिकाणी वधूवर सूचक केंद्र उघडलं गेलं होतं. एक तरुण स्वतःसाठी मुलगी बघायला तिथं आला, स्वागतिकाने त्याला आत जाण्यास सांगितले, तिथं आत दोन दारं होती, एका दारावर लिहले होते की 'तुम्हाला तरुण पत्नी हवीय का?' तर दुसऱ्यावर लिहलं होतं, की 'वयस्कर चालेल?' स्वाभाविकच तरुणाने पहिले दार निवडणे श्रेयस्कर समजले, आणि तो आत गेला. आत परत दोन दारं नजरेस पडली. एकावर पाटी होती 'सुंदर पत्नी' तर दुसऱ्यावर होती 'साधारण पत्नी!' त्याने सुंदर लिहलेल्या पाटीच्या दारातून आत जाण्याचा निर्णय घेतला. आत पुनः दोन दारं दिसली, अर्थात पहिल्या दारावर पाटी होतीच, 'एक जेवण बनवू शकणारी' दुसऱ्यावर 'जेवण न बनवू शकणारी', अर्थातच तरुणाने पहिल्या दारातून जाण्यास पसंती दिली, पुन्हा दोन दारं उभी ठाकली, 'प्रेमळ पत्नी की कजाग?' त्याने प्रेमळ लिहिलेले दार उघडले. आता परत दोन दारं... 'हुंडा आणणारी' अथवा 'हुंडा न आणणारी', त्याने परत पहिले दार निवडले. आता तो शेवटच्या खोलीत पोहोचला होता, तिथं समोर एक मोठी पाटी लावलेली होती आणि एक भला मोठा आरसाही होता. त्या मोठ्या पाटीवर लिहीलं होतं; 'आपल्या अपेक्षा जरा जास्त आहेत, कृपया स्वतःला एकदा आरशात बघून घ्या.'

ह्या गोष्टीतील गमतीचा भाग सोडला तर अशी गल्लत आपणही रोज करत असतो. रोजच्या जगण्यात आपण करत असलेल्या अपेक्षेस आपण पात्र आहोत की नाही हे तपासतच नाही. अनेक लहान सहान गोष्टीत आपल्या ढीगभर अपेक्षा असतात.

कधी केलेल्या कामाचे श्रेय मिळण्याची अपेक्षा, तर कधी कौतुकाची अपेक्षा, कोणाला मदत केली म्हणून त्याच्याकडून धन्यवादाची अपेक्षा, अशा कित्येक अपेक्षा अनाहूतपणे आपल्या मनात घर करून असतात. त्यापेक्षाही बऱ्याचदा वायफळ अपेक्षेने उदाहरणार्थ... 'त्याने ओळखच दिली नाही', 'मला कोणी विचारलेच नाही', 'तो बोललाच नाही', 'त्याने बघितलेच नाही', अशाने स्वतःला त्रास करून घेत असतो, खरं तर खूपदा आपल्या अपेक्षांचं संबंधित व्यक्तीला गंधही नसतो आणि आपण मात्र इकडं त्याच्या नावाने शंख करत, कुढत बसतो आणि आपले मानसिक स्वास्थ्य बिघडवून घेत असतो.

थोडा वेगळा विचार केला तर अपेक्षा म्हणजे काय? तर आपल्यासाठी आपण केलेल्या दुःखाचे बीजारोपणच, कारण अपेक्षाभंग झालं की निर्माण होणारे विषाद, नाराजी, चिडचिड, आकस हे सारे आपल्या मानसिकतेवर नकारात्मक प्रभाव टाकतात. लक्षात असू द्या की, अपेक्षा ही एकटी जन्माला येत नसते, तर तिच्या पाठोपाठ अपेक्षाभंगाचा सलही येतोच.

आपण जेव्हा अपेक्षा ठेवतो एका अर्थाने आपल्या सुखं दुःखाच्या, आपल्या संवेदनेच्या चाव्याच समोरच्याच्या ताब्यात देतो.

त्याने अपेक्षापूर्ती केली तर आपण आनंदी; अन्यथा नाराज. एवढेच नव्हे तर, आपल्या अपेक्षा पूर्ण न करणाऱ्या व्यक्तीबद्दल मनात द्वेषही निर्माण होतो.

खरं पाहता आपण कसं राहावं, आपण कसं असावं एवढंच आपल्या हाती असतं, इतर कोणी कसं असावं, त्यांनी कसं वागावं? हे आपल्या अखत्यारीबाहेर असते, तरीसुद्धा आपण स्वतःच्या आखलेल्या चौकटीतून त्यांना पारखत असतो.

साधारणपणे आपली सारी कामं फळाच्या अपेक्षेवरच बेतलेली असतात, पण भारतीय दर्शनशास्त्र मात्र याला वेगळा साज देतो आणि तीच आनंदी जीवनाची गुरुकिल्ली आहे.

थोडयाशा विवेकदृष्टीने बघितले तर निसर्ग, सूर्य ताऱ्यांपासून ते नदी, झाडं, मातीपर्यंत सारेच त्यांना नेमून दिलेले काम अव्याहतपणे करत असतात, परत काहीही मागत नाहीत. आपणही त्यांच्या गुणांचा स्वीकार केला तर एका सुस्वभावी समाजाची रचना होऊ शकते.

आपण कोणासाठी काही करू शकलो तर 'नेकी कर दर्या में डाल' या उक्तीप्रमाणे त्यास विसरणेच उचित. तेव्हा शक्य होईल तिथं तिथं अपेक्षा कमी करा आणि आनंदी जीवन जगा. सुखी आणि समाधानी जीवनाची हीच एक गुरुकिल्ली आहे, हे नक्की. तुम्ही विचार करा, आणि आपले जीवन अधिकाधिक सुखमय बनवू शकता.

## ड 'रॉकी' चित्रपटाचा थरारक ट्रेलर प्रदर्शित

र्ज, रोग आणि शत्रू या चार गोष्टी वेळीच नष्ट नाही केल्या तर त्या पुन्हा उद्भवतात.' स्वतःच्या अस्तित्वावर, कुटुंबावर आणि प्रेमावर बसलेल्या शत्रूला नेस्तनाबूत करणारा डॅशिंग रॉकी लवकरच मराठी चित्रपट 'रॉकी'च्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. प्रस्तुत आणि सेवेन सीज् व ड्रीम् विव्हर प्रोडक्शन्स निर्मित 'रॉकी' चित्रपटाचा थरारक ट्रेलर प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शक 'अहमद खान' प्रदर्शित झाला. 'रॉकी'च्या निमित्ताने पहिल्यांदाच एक जबरदस्त अॅक्शनपट मराठी चित्रपटसृष्टीत निर्माण झाला आहे. 'रॉकी'चे नंतर त्यावर दिसणारा पिळदार शरीरयष्टीचा तो तरुण् नेमका कोण आहे? याची चर्चा सिनेवर्तुळात रंगली होती.

# शेवगाव तालुक्यातील दिव्यांगाना वैश्विक कार्ड

**शेवगाव । प्रतिनिधी**

पंचायत समिती शेवगाव व आरोग्य विभाग शेवगाव यांनी आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते.शिबिरात तालुक्यातील दिव्यांग मोठया प्रमाणात उपस्थित होते.यावेळी डॉ.क्षितिज भय्या घुले पाटील पंचायत समिती शेवगाव सभापती यांनी शिबिरास भेट देऊन मोठ्या आदराने चौकशी करून दिव्यांगाना काहीही अडचणी येणार नाही या करिता संबंधित अधिकारी यांना सूचना केल्या.व कामकाजाची पाहणी केली.या शिबिरादरम्यान गव्हाणे साहेब,गटकळ साहेब पाटेकर साहेब,आरोग्य विभागाचे अधिकारी,बावचे सर व शिक्षण विभागातील विशेष शिक्षक वर्ग यांनी दिव्यांगाना सर्वतोपरी मदत करण्यासाठी प्रयत्न केले.



यावेळी सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी आलेल्या दिव्यांगाचे फ्रॉर्म भरणे,मार्गदर्शन करणे आदी कामे व्यवस्थित पार पाडली.कोणत्याही दिव्यांगाना अडचण येणार नाही याची काळजी घेतली.यावेळी शिबिरात येण्याकरिता शेवगाव बस स्टँड पासून ते ग्रामीण रुग्णालयात येण्या जाण्यासाठी वाहनांची व्यवस्था केली होती.शिबिरा दरम्यान आलेल्या दिव्यांगाना मदतीची सहानुभूती, माणूसकीचे दर्शन आज सर्व अधिकारी यांच्या कडून झाले.शिबिरा दरम्यान दिव्यांगाना चहा,भिस्कीटे व मोफत अर्ज देण्यात आले.या शिबिरात दिव्यांग व्यक्तींनीही दिव्यांगाना मदत केली व सुदृढ व्यक्तींनीही दिव्यांगाना मदत केली.यावेळी चाँद शेख,बाबासाहेब गडाख,विजय आंधळे,मनोहर मराठे,संभाजी गुठे,आप्पासाहेब खंडागळे,वरकड भाऊ,भरत साळुंके,भाऊसाहेब गव्हाणे,समीर शेख,नवनाथ औटी,फलके मेजर,ऋषि मडके,बाळू जायभाय, रमेश भागवत,शिवाजी आहेर,सयाजी रंधवे,सुवर्णा देशमुख, वंदना तुजारे,सकू मिसाळ,भागीरथी बावधनकर,संजीवनी अदमाने आदी दिव्यांगानी देखील फ्रॉम भरणे,मार्गदर्शन करणे; अशी मदत केली. आज अभिमानाने लिहावे वाटते शेवगाव तालुक्यातील सर्व अधिकारी ,पदाधिकारी व दिव्यांग बांधवात माणुसकीचे दर्शन घडले.या वेळी जवळपास ४१० दिव्यांग बांधवाची नोंदणी झाली.शिबीर यशस्वी पार पाडण्यासाठी नितिन उबाळे साहेबांनी(समाज कल्याण अधिकारी अहमदनगर) देखील सतत अधिकारी यांच्याशी संपर्क साधून शिबिर यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले.

तवीतील विद्यार्थ्यांच्या ख्यदत्तरील

जामखेडमध्ये आज मंत

सकाळ

# कॉपी करू न दिल्याने प्राध्यापकास मारहाण

**शेवगाव, ता. ६ :** परीक्षेमध्ये कॉपी करू न दिल्याच्या रागातून परीक्षा विभागप्रमुखास विद्यार्थ्यांनी मैदानावर मारहाण केली. ही घटना काल (शुक्रवार) दहिगाव-ने (ता. शेवगाव) येथे घडली.

याबाबत प्रा. महेश शेजूळ (रा. नेवासे फाटा, ता. नेवासे) यांनी फिर्याद दिली. सात जणांवर मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला. विद्यार्थी ओंकार राजेंद्र काकडे मोबाईलमधून कॉपी करत असल्याचे समजले. त्याला समज देत असताना त्याने दमबाजी व शिवीगाळ केली. त्यानंतर काकडे याने दुचाकीच्या चेनने, अमोल रामाप्पा गिरम याने फाइटने, पंढरीनाथ भीमराव कोल्हे, अभिजित कावले या दोघांनी वायररोपने, तर शुभम जोशी, अक्षय अपसेटे, प्रसाद शिवाजी दळवी या सात जणांनी शिवीगाळ करत मारहाण केली.

Nagar, Main
07/04/2019 Page No. 4

# कॉपी करण्यास मनाई केल्याने शिक्षकास मारहाण

**भावीनिमगाव, दि. ६ (वार्ताहर)** - परीक्षेत कॉपी करण्यास मनाई केल्याने विद्यार्थ्याने शिक्षकास शिवीगाळ करून दमबाजी केली. तसेच पेपर संपल्यावर सहा-सात मित्रांच्या मदतीने शिक्षकास शाळेच्या आवारातच मारहाण केल्याचा प्रकार शुक्रवारी दहिगाव-ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात घडला. शिक्षकाने मारहाण करणाऱ्या ओंकार राजेंद्र काकडे, अमोल रामप्पा गिरम, पंढरीनाथ भिमराज कोल्हे, अभिजित कावले, शुभम जोशी, अक्षय आपशेटे, प्रसाद दळवी (सर्व राहणार शहरटाकळी) येथील सात जणांविरोधात शेवगाव पोलिसात तक्रार दाखल केली आहे. सविस्तर वृत्त असे, शुक्रवारी शास्त्र विभागाच्या तृतीय वर्षाच्या रसायनशास्त्र विषयाचा पेपर सुरू असताना सुपरविजनला असलेले प्रा. महेश शेजुळ यांनी ओंकार काकडे हा मोबाईलवरून कॉपी करून पेपर सोडवत असल्याचे पाहिले. शेजुळ यांनी मोबाईलची मागणी केली असता, विद्यार्थ्याने अरेरावी केली. शेजुळ यांनी शांततेत मोबाईल दे अन्यथा बाहेर जा, असे म्हटले. त्यावर काकडे याने शिवीगाळ केली. त्यामुळे त्याला वर्गाबाहेर काढून दिले. पेपर संपल्यावर प्रा. शेजुळ खाली आले असता, सहा-सात मित्रांच्या मदतीने प्रा. शेजुळ यांना बेदम मारहाण करण्यात आली. मारहाणीत प्रा. शेजुळ जखमी झाले. प्रकार सुरू असताना, विद्यार्थी व सहशिक्षक सोडवणूक करण्यासाठी धावले असता, मारेकऱ्यांनी पळ काढला. जखमी झालेल्या प्रा. शेजुळ यांना स्थानिक रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. रात्री उशिरा शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाहेरच्या मुलांनी शाळेत प्रवेश करून, नको असलेला प्रकार घडला आहे. तर प्राचार्य, मुख्याध्यापक यांचे ढिसाळ नियोजनही या प्रकरणास कारणीभूत असल्याचे पालक वर्गातून बोलले जात आहे. आपली मुले शाळेत खरेच सुरक्षित आहेत, का असा प्रश्न पालकवर्गातून उपस्थित केला जात आहे.

# कॉपी करू न दिल्याच्या रागातून शेवगाव येथे प्राध्यापकाला मारहाण

**शेवगाव (तालुका प्रतिनिधी)** – वरिष्ठ महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष परीक्षेमध्ये कॉपी करू न दिल्याच्या रागातून महाविद्यालय परीक्षा विभाग प्रमुखास सदर परीक्षार्थी विद्यार्थी व त्याच्या मित्रांनी महाविद्यालयाच्या मैदानावर चेन, वायररोप व फायटरने मारहाण केल्याची घटना शुक्रवार दि. ५ रोजी दुपारी ४ च्या सुमारास दहिगाव ने ता. शेवगाव येथे घडली. पोलिसांनी या सात जणांविरुध्द मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेने शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणाची फिर्याद मारहाण झालेले प्रा. महेश नामदेव शेजूळ रा. नेवासे फाटा ता. नेवासे यांनी दिली आहे. दहिगाव ने येथील मारुतराव घुले पा. महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाची वरिष्ठ वर्गाची वार्षिक परीक्षा सुरु आहे. तेथे तृतीय वर्ष रसायनशास्त्र या विषयाच्या परीक्षेसाठी परीक्षा विभागप्रमुख म्हणून कामकाज करत होतो. परीक्षा सुरु असताना ब्लॉक नंबर ८ मध्ये पर्यवेक्षण करत असलेले प्रा. संदीप नलवडे यांनी एक विद्यार्थी मोबाईल फोन मधून कॉपी करत असल्याचे आपणास सांगितले. विद्यापीठ नियमानुसार ते कायद्यात बसत नसल्याने मी नलवडे यांच्या सोबत सदर परीक्षा खोलीत गेलो. तेव्हा पहिल्या रांगेतील विद्यार्थी ओंकार राजेंद्र काकडे मोबाईलमधून कॉपी करत असल्याचे समजले. मी त्याचा मोबाईल घेऊन अशा प्रकारे कॉपी करु नको म्हणून समज दिली. मात्र काकडे याने मला कोणीही अडवू शकत नाही असे म्हणत दमबाजी व शिवीगाळ केली. त्यानंतर मी त्याला वर्गाबाहेर काढले. पेपर संपल्यानंतर सर्व पेपर जमा करून परीक्षा विभागाकडे चाललो असता मैदानावर ४ च्या सुमारास काकडे याने दुचाकीच्या चेनने, गिरम अमोल रामाप्पा याने फायटरने, पंढरीनाथ भीमराव कोल्हे, अभिजीत कावले या दोघांनी वायररोपने तर शुभम जोशी, अक्षय अपशेटे, प्रसाद शिवाजी दळवी या सात जणांनी कॉपी करु न दिल्याच्या कारणावरून शिवीगाळ करत मारहाण केली. त्यानंतर प्रा. बाबासाहेब घुले व लिपीक सोमनाथ नीळ यांनी मध्यस्थी करून मला सोडवले. त्यानंतर ही सर्व मुले पळून गेली. या मारहाणीत शेजूळ यांच्या डोक्याला जखम तर पाठीवर मारहाण केल्याचे वळ उमटले होते.

याबाबत पोलिसांनी या सात जणांविरुध्द मारहाण करून शासकीय कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल केला आहे. घटनेनंतर दुसऱ्या दिवशी कुणालाही अटक करण्यात आली नाही. याबाबत पुढील तपास पोलीस निरीक्षक रामराव ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक नितीन मगर करीत आहेत.

लोकमत

# 'स्मार्टफोन'मुळे मेंदू दगड बनत चाललाय!

## राणी बंग : पालकांनो, वेळीच मुलांना सावरा

अभय लांजेवार ।
लोकमत न्यूज नेटवर्क

उमरेड : एकीकडे आईवडील जेवणाच्या टेबलवर बसलेले आणि दुसरीकडे मुलांच्या हातात 'स्मार्टफोन'. आई तिच्या बाळाला घास भरवते. तोंडासमोर घास आणून ठेवलेला आणि बाळ मोबाईल गेममध्ये मग्न. मध्येच त्याची इच्छा होईल त्यावेळेस त्याला घास भरविला जातो. मग मुलं सातत्याने मोबाईलमध्येच तोंड खुपसतात. कालांतराने त्यांना इतरांच्या भावना समजत नाही. संवेदना संपल्याचाच हा प्रकार वारंवार घडतो. 'स्मार्टफोन'मुळे मेंदू दगड बनत चाललाय. तेव्हा मुलांनो ब्ल्यू व्हेल, पबजी यासारख्या जीवघेण्या गेमच्या व्यसनापासून आताच सावध राहा. पालकांनो, मुलांना वेळीच आवरा, असा मौलिक सल्ला गडचिरोली जिल्ह्यातील 'सर्च' या संस्थेच्या सहसंचालक पद्मश्री डॉ. राणी बंग यांनी दिला. प्रस्तुत प्रतिनिधीने घेतलेल्या विशेष मुलाखतीच्या निमित्ताने त्या बोलत होत्या.

उमरेड येथील रितीक विवेक कोलारकर (१९) तसेच खुशी जगजित परिहार (२०) रा. हिंगणा या दोन वेगवेगळ्या घटनांमुळे मुलं कुठे भरकटत चालली, असा सवाल करीत यात दोष पालकांचा आहे, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. रितीक कोलारकर यास पबजीचे व्यसन जडले होते. त्यानंतर त्याच्यावर मेडिकलमध्ये उपचारही केले. मानसोपचार तज्ज्ञांनीही देखरेख केली. त्यानंतर त्याच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या. शिवाय घामगंड आजारानेही तो त्रस्त होता. यातूनच त्याच्यावर मृत्यू ओढवला. आज गल्लोगल्लीत, घरादारात पबजीचे वेड लागल्याचे चित्र दिसून येत आहे. शिवाय या व्यसनाच्या आहारी जाऊन अनेक व्याधीही पुढे येत आहेत. उमरेडच्या या घटनेमुळे समाजमन सुन्न झाल्याचे चित्र आहे.



उमरेड येथे तारुण्यभान या शिबिराप्रसंगी आलेल्या डॉ. राणी बंग यांनी लोकमतशी खास बातचीत केली.

अलीकडे दोन तीन वर्षाच्या मुलांनाही अगदी बिनधास्त मोबाईल दिला जातो. अशावेळी आमची मुलं-मुली किती स्मार्ट आहेत. त्याचे तोंडभरून कौतुक केले जाते. इतक्या लहान वयात टीव्हीसमोर, तासन्‌तास मुलांच्या हातात मोबाईल देणे या बाबी घातक आहेत. मी तंत्रज्ञानास वाईट म्हणत नाही. त्याचा उपयोग कसा करता, हे महत्त्वाचं आहे, अशी मौलिक बाबही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितली.

### 'गेम'चे व्यसन महाभयंकर

चित्रपटासारखं आयुष्य सुपरफास्ट नसतं. यामुळे आपली मुलं नेमकी काय करीत आहेत, काय बघत आहेत, याकडे पालकांनी बारकाईने लक्ष दिले पाहिजे. सतत मोबाईलमध्येच डोकं खुपसत राहिल्यामुळे मेंदू बधिर होतो. आपल्या भावना व्यक्त करता येत नाही. दुसऱ्यांच्या भावनाही समजत नाही, ही बाब अत्यंत धोकादायक आहे. मग खाण्यात, खेळण्यात आणि शिक्षणात आपसुकच दुर्लक्ष होतं. दारु आणि ड्रग्जपेक्षाही पबजी, ब्ल्यू व्हेलसारख्या मोबाईल गेमचे हे महाभयंकर 'व्यसन' आहे.

### ही कम्युनिकेशन गॅप

खुशी परिहार ही मुलगी घर सोडून गेली. काय केलं पालकांनी? मुलांवर धाक नको का? संवाद पाहिजे. अशावेळी आई-वडिलांनी चर्चा करायला पाहिजे. संवादाला वेळच नाही. ही जनरेशन गॅप नाही. कम्युनिकेशन गॅप आहे. शाळा-कॉलेजमध्ये पाठवलं. शिकवणी वर्ग लावून दिले की जबाबदारी संपली. मुलांसाठी वेळ काढा. त्यांच्या गरजा समजून घ्या. 'मागेल ते द्यायचं' असे लाड पुरविले गेले की मग त्या मुलांना त्याच सवयी लागतात. एखाद्या प्रेमात नकार दिला की ते पचविण्याची ताकद नसते. मग हत्या नाही तर आत्महत्या घडतात. आपण समाज म्हणून आणि पालक म्हणून कमी पडत आहोत, अशीही वास्तविकता त्यांनी व्यक्त केली.

### योग्यवेळी उपचार

हे व्यसन सोडविण्यासाठी योग्यवेळी उपचार महत्त्वाचे आहेत. निदान मानसोपचार तज्ज्ञांकडे घेऊन गेले पाहिजे, असे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. उपचारासोबतच पुन्हा चर्चा, संवाद, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढविणे महत्त्वाचे आहे. त्यानंतर पर्यायी इतर साधने उपलब्ध आहेत, याची जाणीव करून द्या. हे व्यसन आहे. पालकांच्या बसची बात नाही. कितीही सांगितलं तरी समस्या सुटणार नाही. त्यांना सायक्रेटिक कौन्सिलिंग आणि डी-ॲडिक्शन थेरपी देणे गरजेचे आहे, अशीही बाब डॉ. बंग यांनी मांडली.

लोकमत

# लोकमान्य टिळक : भारतीय स्वातंत्र्याचे द्रष्टे भाष्यकार



## दृष्टिकोन

डॉ. अजित मगदूम। अभ्यासक



सन १९०८. 'केसरी'मधील टिळकांनी लिहिलेल्या लेखाविरुद्ध भरलेल्या देशद्रोहाच्या खटल्याचा निकाल लागला. टिळकांना ६ वर्षांचा कारावास आणि १ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. ज्या ९ न्यायालयीन पंचांच्या निवाड्यावर आधारित हा निकाल देण्यात आला त्यातील ७ युरोपियन पंचांनी टिळकांना दोषी ठरवलं तर २ भारतीय पंचांनी ते निर्दोष असल्याचं मत मांडलं. टिळकांना म्यानमारमधील मंडाले येथील तुरुंगात ठेवण्यात आले. तेथे त्यांनी 'गीता रहस्य' हा ग्रंथ लिहिला. ६ वर्षांनंतर त्यांची मुक्तता झाल्यानंतर देशभर लोकांनी टिळकांचं उत्स्फूर्त स्वागत केलं. या स्वागतातूनच लोकांनी त्यांना 'लोकमान्य' ही उपाधी दिली.

''जर एक भारतीय मुख्य न्यायाधीशाच्या खुर्चीत विराजमान होत असेल तर ते लोकमान्य टिळकांनी सोसलेल्या अपार यातना आणि त्यांच्या बलिदानामुळेच.'' स्वतंत्र भारतात १९४८ साली मुंबई हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाल्यानंतर न्यायमूर्ती एम. सी. छगला यांनी वरील उद्गार काढले होते.

पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून बी.ए. गणित विषयात उत्तीर्ण झाल्यानंतर टिळकांनी एम.ए. शिक्षण मध्येच सोडून कायद्याची पदवी संपादन केली. देशात ब्रिटिश सत्तेचा वारु चौखूर उधळत होता. तेव्हा भारतीय सामान्यजन अन्याय, अत्याचार व दडपशाहीखाली भरडून निघत होते. सबंध देश ब्रिटिशांच्या गुलामगिरीत खितपत असल्याच्या विचाराने टिळकांच्या मनात अस्वस्थता वाढत होती. एका बाजूला शिक्षण प्रसाराने लोकांच्यात स्वराज्याबाबत सजगता निर्माण होईल असे वाटून न्यू इंग्लिश स्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन केली. तर दुसरीकडे यापेक्षाही व्यापक जनजागृती करण्यासाठी 'केसरी', 'मराठा' यांसारखी वृत्तपत्रे सुरु केली. स्वराज्याच्या कल्पनेने त्यांच्या मनात ठाण मांडले होते. या वृत्तपत्रांतून इंग्रजांच्या अन्यायाविरुद्ध वाचा फोडण्यासाठी आपली संपादकीय कारकिर्द पणाला लावली. सरकारच्या दडपशाहीविरुद्ध जहालपणे लिहिण्यामुळेच त्यांना कारावासही सोसावा लागला. यामुळेच ब्रिटिश पत्रकार, लेखक व्हलेंटाईन शिरोल यांनी लोकमान्य टिळकांना त्यांच्या 'भारतीय असंतोष' (१९१०) या पुस्तकात 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हटल्याने हे विधान प्रसिद्ध झाले. १८८६ मधील दुष्काळात शेतकऱ्यांकडून सारा गोळा करण्यास विरोध करुन आंदोलन छेडले. या काळात टिळकांनी शेतकरी व कष्टकरी जनतेला संघटित करुन 'दुष्काळ साहाय्यता कायद्या'प्रमाणे दुष्काळपीडित शेतकऱ्यांना साहाय्य करण्यासाठी सरकारवर दबाव आणला.

तिकडे लॉर्ड कर्झनने बंगालच्या फाळणीचा घाट घातल्याने लोकमान्य टिळक, लाला लजपत राय व बिपिनचंद्र पाल यांनी आंदोलन उभारले. सरकारच्या या कुटिल कृत्याविरुद्ध देशभर असंतोष पसरविण्यात या तिघांना यश आले. यामुळेच त्यांना 'लाल, बाल, पाल' असे गौरवपूर्ण संबोधन प्राप्त झाले. शिवजयंती व गणेशोत्सव सार्वजनिकरीत्या साजरा करण्यासाठी चालना देणाऱ्या लोकमान्यांचा लोकसंग्रह अफाट वाढत गेला. दीड वर्षांच्या तसेच सहा वर्षांच्या तुरुंगवासाने राष्ट्रीय पातळीवर एक निडर, झुंझार स्वातंत्र्य सेनानी म्हणून टिळकांची ओळख निर्माण झाली. टिळक कोणत्याही क्षणी डगमगले नाहीत. स्वराज्यासाठी बलिदान देण्याची तयारी हे भारतीय स्वातंत्र्याच्या महत्त्वाकांक्षेचं टिळक हे एक प्रतीक होते. राष्ट्रीय काँग्रेसच्या व्यासपीठावरून अरविंद घोष, व्ही. ओ. चिदंबरम, पिल्लई, महम्मद अली जीना यांसारख्या मातब्बरांची फळी निर्माण केली.

''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच!'' हा नारा देणारे टिळक. प्लेग साथीच्या वेळी फवारणीच्या छद्मी धोरणावर 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' असा जळजळीत अग्रलेख लिहिणारे टिळक. दुष्काळात शेतकऱ्यांकडून कर वसूल करण्यास ब्रिटिश सरकारला विरोध करणारे टिळक असे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू संपूर्ण देशभर परिचित आहेत. लोकमान्य टिळक हे लढवय्ये नायक होते तसेच ते विद्वान तत्त्वचिंतकही होते. एका बाजूला असंतोषाचे जनक तर दुसऱ्या बाजूला संयमी, विवेकी, स्थितप्रज्ञही. टिळकांच्या ठायी जात्याच असलेली सत्त्वशीलता, कणखरपणा व चिंतनशीलता हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा गाभा तसा अलक्षितच राहिला. टिळक हे काम करण्यावर निष्ठा असणारे कर्मवीर होते. त्यांनी 'गीता रहस्य' लिहिले. अध्यात्म आणि जीवनमूल्ये, अध्यात्म आणि विशुद्ध समाजकार्य, अध्यात्म आणि लोकसंग्रह असं एक नवं अद्वैत टिळकांनी मांडलं. टिळकांच्या विचारांचे अनेकविध आयाम आजच्या काळात नि:संशय प्रस्तुत ठरतील.

पुढारी

# स्मरण अण्णा भाऊंच्या वाङ्‌मयाचे



**समाजातील अज्ञान, अत्याचार, जाती-धर्म भेद अंधश्रद्धा या बाबींवर लेखणीचा आसूड ओढणारे आणि स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय याचे समर्थन करणारे साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्दी वर्षाची सुरुवात गुरुवार, दि. १ ऑगस्टपासून होत आहे. त्यानिमित्त...**



अण्णा भाऊ साठे यांनी बहुविध स्वरूपाची वाङ्मयनिर्मिती केली. त्यांच्या वाङ्मयनिर्मितीला अनेकविध स्वरूपांची परिमाणे आहेत. सामाजिकदृष्ट्या अण्णा भाऊंच्या वाङ्मयाचे स्मरण हे नेहमीच समाजाला प्रेरक आहे. सांगली जिल्ह्यातील वाटेगावसारख्या छोट्या गावात अण्णा भाऊंचा जन्म झाला. रूढ शिक्षण न झालेले मात्र अवतीभवतीच्या समाजजीवनाने व सजीव अशा लोकपरंपरेने त्यांचा मन:पिंड घडला. लहानपणीच अण्णा भाऊंच्या कुटुंबाला उपजीविकेसाठी मुंबईला जवळ करावे लागले. आणि एका नव्या संघर्षभूमीत अण्णा भाऊंचा प्रवेश झाला. मुंबईच्या वास्तव्याने त्यांच्या आयुष्याला नवी कलाटणी मिळाली. एक कार्यकर्ता, लेखक, कवी म्हणून त्यांची घडण या शहाराने केली.

अण्णा भाऊंच्या समग्र लेखनात वर्गीय-जातीय भानाचा आविष्कार आहे. त्यांच्या वाङ्मयातील माणसे ही सर्वसामान्य, वंचित, कामगार, पीडित आहेत. ही पिचलेली मात्र न डगमगणारी जीवनाच्या संघर्षभूमीत सदैव उभी राहणारी. म्हणूनच, प्र. क. अत्रे यांनी 'लढणाऱ्या माणसाची कथा' असे त्याचे वर्णन केले होते. 'मी आणि माझा पिंड मुंबईच्या कामगारवर्गाने घडवला आहे', या भूमिकेतून ते लिहीत आले.

अण्णा भाऊंच्या वाङ्मयाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या जीवनानुभवाचा प्रदेश विस्तृत आणि व्यापक होता. मुंबईच्या चिरानगरच्या झोपटपट्टीपासून वारणा खोऱ्यातील सळसळता प्रदेश त्यांच्या वाङ्मयात आहेत. अनेकविध क्षेत्रांतील म णसांचे जगणे त्यांनी रेखाटले. मार्क्सवादी, आंबेडकरवादी जीवनदृष्टीचा आविष्कार त्यांच्या लेखनात आहे. त्यामुळे एका बाजूला संघर्षाचा पवित्रा, प्रतिकार आणि उद्याच्या कामगार, श्रमिकांच्या सुखस्वप्नांचे जग अण्णा भाऊंनी रेखाटले. 'पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून, ती दलितांच्या मनगटावर तरली आहे.' किंवा 'जग बदल घालुनि घाव, सांगून गेले भीमराव' अशा जागृत अस्मिताभानाचा कृतज्ञता संघर्षाचा स्वर अण्णा भाऊंनी मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभा केलेल्या सामूहिक जागरणाला अण्णा भाऊ समकक्ष राहिले. शोषण विरुद्ध रूढीबंडांची जाण त्यांच्या कथेत आहे. तर मुंबईच्या झोपडपट्टीत राहणारी एक निराधार म्हातारी मृत्यूपश्चात आपल्या तोंडात ठेवण्यासाठी पदराच्या गाठीत बांधून ठेवलेला सोन्याचा मनी ती बाबासाहेबांच्या पक्षाला मदत म्हणून देते. डॉ. आंबेडकरांचे निधन हे तिला दु:खाचा डोंगर कोसळल्याची जाणीव होते.

अण्णा भाऊ वर्गीय जाणिवेचे लेखक होते. अर्थात, हे वर्गसंबंध कामगार, शोषित, वंचितांच्या बाजूचे होते. त्यामुळे भांडवलदार आणि कामगार, सरंजाम दार आणि मजूर-दलित अशा द्विबिंदूतून संघर्षाची चित्रे त्यांनी रेखाटली. 'मलबार हिल इंद्रपुरी कुबेराची वसती नि परळात राहणारे रात्रंदिवस राबती' असे वर्गीय विषमतेचे भान अण्णा भाऊंना होते. मार्क्सवादी विचारदृष्टीचा भाग म्हणून तो आदर्शवादाच्या अंगाने चित्रित झाला. या जीवनदृष्टीने त्यांच्या कथा-कादंबऱ्या, वग, शाहिरी कवितेला आकार मिळाला. महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय चळवळीतील त्यांच्या प्रत्यक्ष सहभागाचादेखील त्यांच्या लेखनावर परिणाम झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीपासून, महागाई आंदोलन, गिरणी कामगारांच्या आंदोलनांनी त्यांच्या वर्गीय लढ्याला अधिक धारदार बनविले. किंबहुना, अण्णा भाऊंच्या वगनाट्यात आणि शाहिरीत या लोकचळवळींच्या गजबजाटाचा, लढायांचा भाग अधिक आहे. स्थानिक प्रश्नांपासून ते आंतरराष्ट्रीय राजकीय लढ्यांचा पैस त्यांच्या वाङ्मयात आहे. 'आता वळू नका, रणि पळू नका, कुणि चळू नका, बिनी म रायची अजून राहिली' याचे तीव्र असमाधान त्यांच्या लेखनात होते. हा लढाऊ बाणा त्यांच्या शाहिरीत सतत आहे. श्रमजीवी जनतेविषयी अपार कळवळा सहानुभूती त्यांच्या लेखनात होती.

अण्णा भाऊ आणि परंपराप्रेम हादेखील महत्त्वाचा भाग आहे. या भूमीची, माणसांची, त्यांच्या लढायांची, पराक्रमांची अत्यंत उदात्त भाषेत त्यांनी वर्णने केली आहेत. अण्णा भाऊंच्या वाङ्मयातील 'महाराष्ट्र' अभ्यासणे हा वैशिष्ट्यपूर्ण ठेवा ठरेल. त्यांच्या नायकांचे वर्णन 'वीरनायक' असे करता येईल. 'माझी मैना' ही प्रेमकविता नाही, तर अतिशय सर्जनशील सामूहिक आवाहनपर राजकीय कविता आहे. महाराष्ट्र एकमेळीचे आणि भूमीच्या तुटातुटीचे कल्पक प्रतीकात्मक चित्र 'माझी मैना' या कवितेत आहे. महाराष्ट्रावरील अखंड आणि गतिशील प्रेम त्यांच्या वाङ्मयातून साकार झाले. नवमहाराष्ट्राच्या घडणीचा त्यांनी सतत पुरस्कारच केला. अण्णा भाऊंच्या लेखनात परंपरेतील अभिजन-बहुजनांच्या संघर्षाची सुस्पष्ट अशी रेषा आहे. 'ही अवनी आदिवाशांची, कोळी भिल्लांची, मांग रामोशांची, कैक जातींची प्राणाहुनि प्यार' अशा विशाल इतिहास समाजदृष्टी त्यांच्या वाङ्मयात आहे. किंवा 'ही पांढर सर्वांचीच आहे' या व्यापक भूमिकेचे अण्णा भाऊंनी लेखन केले.

एका बाजूला राजकीय चळवळीचे भान म्हणून त्यांचे वाङ्मय बहुप्रिय ठरले. याची कारणे अण्णा भाऊंच्या लेखनातील लोकपरंपरेतील आवाहनप्रिय लेखनतंत्राचा वापर. लावणी, पोवाडा, गण, वगनाट्य, शब्दकळा आणि छक्कड ही लोकसमूहांनी साक्षात केलेल्या रूपबंधांचा कल्पक वापर अण्णा भाऊंनी केला. राजकीय लढ्याला भाषेची आवश्यकता असते. तसेच लढाईचा एक भाग म्हणून आक्रमणाची, आघाताची भाषा अण्णा भाऊंनी रूढ केली. एक प्रतिकाराची भाषा अण्णा भाऊंनी दिली. या साऱ्या राजकीय, सामाजिक भानाबरोबरच अण्णा भाऊंच्या वाङ्मयाला अफाट वाचकवर्ग लाभला. त्यांच्या कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले. कादंबऱ्यांच्या अनेक आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. समूहशरणता, परंपराप्रेम, भारतीयत्वाची चौकट, आदर्शवादाची ओढ तसेच भाषेचा अलंकरणपर काव्यात्म वापर, या आवाहनपरतेमुळे अण्णा भाऊंचे वाङ्मय सर्वदूर पोहोचले. त्यास वाचकप्रियता लाभली.

अण्णा भाऊंचे वाङ्मय नव्याने वाचले जावे. तसेच त्यांच्या एकंदर जीवनदृष्टीतील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक भानाबरोबर त्यांच्या रूपबंधाचा आणि महाराष्ट्रीय सांस्कृतिक जीवनाचा नव्याने अन्वयार्थ लावता येऊ शकतो. सुजाण कार्यकर्ते तसेच वाचकांसाठी अण्णा भाऊंच्या वाङ्मयाची पुनर्भेट ही नेहमीच आश्वासक ठरेल.

**- प्रा. डॉ. रणधीर शिंदे**

# जाणा पीकविमा योजनांचे महत्त्व

**पीकविमा योजनेविषयी उलटसुलट चर्चा होत असली तरी शेतकऱ्यांना संकटात आधार देण्याची त्यातल्या त्यात व्यवहार्य अशी जगात मान्य असलेली ती पद्धत आहे. त्यामुळे अशा योजनांतील त्रुटी दूर करताना शेतकरी अशा योजनांपासून दूर जाणार नाही, याची विशेष काळजी घेतली पाहिजे.**

देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सरकारने घेतले आहे. त्या दिशेने अनेक आघाड्यांवर प्रयत्न सुरू आहेत. पण जेथे शेतकरी कुटुंबांची संख्या सुमारे १२ कोटी तर शेतमजुरांची संख्या सुमारे १४ कोटी इतकी आहे आणि जेथे जमिनीचे मापनही नीट झालेले नाही, अशा आपल्या देशात हे आव्हान पेलणे अवघड आहे. शिवाय शेतीमध्ये खेळणारा पैसा सातत्याने कमी होत असल्याने शेती आणि शेतकऱ्यांसाठी काहीही करायचे म्हटले की, त्याला व्यावहारिक मर्यादा येतात, असा आतापर्यंतचा अनुभव आहे. अर्थात, हा प्रश्न देशातील ५० टक्के नागरिकांशी संबंधित असल्याने त्याला प्राधान्य दिले गेले पाहिजे, याविषयी दुमत असू शकत नाही.

शेतकऱ्यांची स्थिती कशी सुधारेल, यासाठीचे प्रयत्न अनेक दशके सुरू असले तरी त्यात सरकारला यश येत नाही, याची कारणे अनेक आहेत. त्यांची चर्चा करण्यापेक्षा सध्याच्या परिस्थितीत त्यातल्या त्यात व्यवहार्य काय केले जाऊ शकते, याचा विचार केला पाहिजे. भारतात शेतकऱ्यांची परिस्थिती खालावली, तशी ती जगातही अनेक देशात खालावली होती. त्याचे कारण सर्वच सरकारांनी औद्योगिक विकासाला दिलेले महत्त्व. पण विकसित देशांत शेतकऱ्यांची संख्याच कमी असल्याने आणि जमीन त्या तुलनेत अधिक असल्याने शेतकऱ्यांची स्थिती सुधारणे, त्या सरकारांना शक्य झाले. शेतीत एका दाण्याचे १०० दाणे करण्याची क्षमता आहे आणि ही क्षमता इतर कोणत्याही उद्योगात नाही. मात्र हे जसे त्याचे शक्तिस्थान आहे, तसेच तेच त्याच्या मुळावर उठले आहे. शेतीत चांगले उत्पादन झाले की, पुरवठा वाढतो आणि त्याचे भाव पडतात तर उत्पादन कमी झाले की, नागरिकांना भाववाढीची झळ बसू नये म्हणून सरकार हस्तक्षेप करते आणि त्या शेतीमालाची आयात करते. लोकशाही पद्धतीने निवडून गेलेल्या कोणत्याही विचारसरणीच्या सरकारला असे करण्याशिवाय पर्यायच नसतो. ज्या देशांच्या तिजोरीत पैसा अधिक येतो, ते देश अशावेळी शेतकऱ्यांना अनुदान देतात. भारतासारख्या देशाला मात्र ते परवडत नाही, हा आजपर्यंतचा इतिहास आहे.

या सर्व परिस्थितीत शेतकऱ्यांची स्थिती कशी सुधारेल, याचा विचार करावयाचा झाल्यास त्यातल्या त्यात व्यवहार्य काय केले जाऊ शकते, या प्रश्नाचे जगाने शोधलेले उत्तर पीकविमा हे आहे. विमा योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्वांकडून विशिष्ट रक्कम घेणे (हप्ता) आणि ज्याचे नुकसान झाले, त्यांनाच भरपाई देणे, यावर विमा योजना चालतात. जसे आरोग्य विम्यात आपल्याला भरपाई मिळू शकते, म्हणून आपण आजारी पडलेच पाहिजे, असे सर्व जण मानत नाहीत, म्हणून विमा व्यवसाय चालू आहे. उद्या सर्वांनीच भरपाई वसूल करावयाची ठरविली तर तो व्यवसायच चालू शकणार नाही. हे तत्त्व शेतीत मात्र तसे अनुसरता येत नाही. कारण शेतीवर काही ना काही संकटे दरवर्षी येतच राहतात शिवाय शेतीतून शेतकऱ्याला पुरेसे मिळाले, असे क्वचितच होते. त्यामुळे भरपाई ज्या शेतकऱ्यांना दिली गेली पाहिजे, अशा शेतकऱ्यांची संख्या नेहमीच अधिक असते. त्यात विमा कंपन्या करत असलेल्या नफेखोरीची भर पडू शकते. त्यातून पीकविमा योजनेविषयी शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर वेळोवेळी उठतो.

अशा या पीकविमा योजनेच्या अंमलबजावणीत कितीही अडचणी असल्या तरी आजच्या परिस्थितीत विमा योजनाच भारतातील शेती प्रश्नावर त्यातल्या त्यात व्यवहार्य उत्तर देऊ शकतात, याचे भान ठेवले पाहिजे. सुदैवाने सध्याच्या सरकारला विमा योजनेचे महत्त्व लक्षात आल्याने या सर्व गदारोळात विमा संरक्षण घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या कशी वाढेल, यासाठी सरकार प्रयत्न करताना दिसते आहे. पीक विमा योजनेची अंमलबजावणी आणि विस्तार करण्याची चर्चा आपल्या देशात गेली ७० वर्षे सुरू आहे, हे जाणून आपल्याला आश्चर्य वाटेल. इच्छाशक्तीचा अभाव आणि शेतीतील जटील प्रश्नांमुळे ही योजना पुढे जाऊ शकली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'प्रधानमंत्री फसल विमा योजना' जाहीर केली (२०१६) आणि ती जास्तीत जास्त शेतकऱ्यांना लागू व्हावी, यासाठीचे प्रयत्न सरकारी यंत्रणेने केले, त्यामुळे तिचा चांगला विस्तार झाला आहे. शेतकऱ्यांनी किरकोळ हप्ता भरला तरी त्याला सर्व भरपाई देणारी ही योजना आहे. पीकविमा भरण्यासाठी रांगा लागणे आणि हप्ता घेण्यास मुदतवाढ करावी लागणे, असे चित्र पूर्वी कधी पाहण्यास मिळाले नव्हते. त्याचाच परिणाम म्हणजे ज्या जमिनीवर पीक घेतले जाते, अशा २२ टक्के जमिनीवरील पिकांचा २०१३-१४ मध्ये विमा काढला जात होता, ते प्रमाण २०१६-१७ मध्ये २९ टक्के झाले आहे. ही मोठी झेप आहे. हवामानावर आधारित पीकविमा योजना अशी दुसरी योजना सरकार राबविते. या दोन्ही योजनेत ८० लाख शेतकऱ्यांनी गेल्या वर्षी भाग घेतला आणि त्यांना ९ हजार ४६ कोटी रुपयांची भरपाई मिळाली. किमान ५० टक्के जमिनीवरील पिकांचा विमा काढलेला असावा, असे उद्दिष्ट सरकारने ठेवले असून तो टप्पा दूर असला तरी गेल्या तीन वर्षांतील त्याची वाटचाल आश्वासक आहे. यात विमा कंपन्यांनी फायदा घेतला, असा आक्षेप घेतला जाऊ शकतो. पण व्यवसाय करणाऱ्या कंपन्या तो घेणारच, हे समजून घेतले पाहिजे. तो फायदा जर प्रमाणापेक्षा अधिक असेल तर त्यात सरकारने हस्तक्षेप केला पाहिजे.

पीकविमा योजनांविषयी नकारात्मक निष्कर्ष काढण्याची काही तज्ज्ञांना घाई झाली आहे, जी निषेधार्ह आहे. अशा विमा योजनांत काळानुसार, प्रदेशानुसार दुरुस्त्या निश्चितच होऊ शकतात. पश्चिम बंगालने राज्यात स्वतंत्र पीक योजना लागू केली आहे, हा त्यातलाच प्रकार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यापासून प्रवृत्त करण्यापेक्षा त्यांना त्या योजनात भाग घेण्यास प्रोत्साहन देण्यात शहाणपणा आहे. शेतीचे असे प्रश्न चीन आणि अमेरिका अशा देशांतही होतेच. ते सोडविण्याच्या प्रयत्नांचा भाग म्हणून चीनने ही विमा योजना ६९ तर अमेरिकेने ८९ टक्के पिकाऊ जमिनीपर्यंत पोहोचविली आहे. याचा अर्थ जेथे भारताइतके वैविध्य नाही, जेथे जमीन आणि पीक नोंदणीचे जटील प्रश्न नाहीत, त्या देशांतसुद्धा पीकविमा सर्व शेतकऱ्यांपर्यंत

लोकमत

## निकाल वाढणार : लेखी परीक्षा ८० तर मूल्यमापन २० गुणांचे

# ९ वी ते १२ वीसाठी अतिरिक्त गुण

लोकमत न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने वर्षापासून इयत्ता दहावीला भाषा व सामाजिक शास्त्र विषयाला मिळणारे अंतर्गत गुण बंद केले होते. परंतू दहावीच्या निकाल घसरल्याने पुन्हा इयत्ता ९ वी ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना अंतर्गत गुण सुरु करण्यात आल्याने गुणांची टक्केवारी वाढणार असून अनुतीर्ण होण्याचे प्रमाण कमी होणार आहे.

मागील वर्षी सीबीएसई आणि आयसीएसइ मंडळाच्या दहावीच्या विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण सुरु असल्याने त्यांचा निकाल चांगला लागला. मात्र राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांना राज्यातील नामांकित ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्यासाठी स्पर्धा करावी लागली. त्यातच अनेक विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. परिणामी, विद्यार्थी व पालकांनी शिक्षण विभागावर संताप व्यक्त केल्या गेल्याने शिक्षणमंत्र्यांनी शिक्षण आयुक्त विशाल सोळंकी यांच्या अध्यक्षतेखाली इयत्ता व नववी व बारावीची विज्ञान रचना व मूल्यमापन पद्धतीचा अभ्यास करण्याची २५ सदस्यांची समिती गठित केली होती. सदर समितीच्या शिफारशीनुसार शासनाने २०१९-२० पासून शिवाय योजना व सुधारित मूल्यमापन योजना ८ व ९ ऑगस्टच्या आदेशाने जाहीर केली आहे.

लेखी मूल्यमापनासोबबत विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या क्षमतांचे मापन करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सातत्यपूर्ण मूल्यमापन होण्यासाठी अंतर्गत मूल्यमापन समाविष्ट करण्यात आले आहे. इयत्ता ९ वी व १० वीसाठी भाषा सामाजिक शास्त्र विषय ज्ञानासाठी ८० गुणांची लेखी परीक्षा व २० गुणांचे अंतर्गत मूल्यमापन राहणार आहे.

इयत्ता ९ वी व इयत्ता १० वी मध्ये उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयात लेखी व अंतर्गत मूल्यमापन मिळून किमान ३५ गुण प्राप्त करणे अनिवार्य करण्यात आले आहे. शास्त्रीय कला, चित्रकला, लोककला व क्रिडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणारे सवलतीचे अतिरिक्त गुण सुरु राहणार आहेत. ३०० गुणांच्या तीन भाषा विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी किमान १०५ गुण आवश्यक राहणार आहेत. त्यापैकी १०० गुणांच्या भाषा विषयांमध्ये किमान २५ व दोन्ही संयुक्त भाषा विषयांमध्ये मिळून किमान २५ गुण प्राप्त करणे आवश्यक राहणार आहेत.

विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुणांमुळे निकालामध्ये वाढ होणार आहे. मात्र यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ताही ढासळत असल्याच्या प्रतीक्रिया व्यक्त होत आहेत.

### जिल्हा कर्मचाऱ्यांना देणार प्रशिक्षण



नववी ते बारावीतील विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यात आले असली तरीही त्यांना उत्तीर्ण होण्यास किमान गुणाची अट ठरविण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना उत्तीर्ण करण्यात येत आहे. यासबंधी जिल्हास्तरावरील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांना पुणे येथे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानंतर सदर कर्मचारी सर्व शाळेतील संबंधित शिक्षकांना प्रशिक्षण देणार आहेत. मात्र शासनाच्या या नव्या निर्णयामुळे निकालाचा परिणाम वाढणार असल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.


जनता शिक्षण प्रसारक मंडळ-शैक्षणिक संकुल
दहिगांवने, ता. शेवगांव, जि. अहमदनगर.
स्थापना - ६ जून १९५९

तकर
द्वतीय
गायन
हिने

या अगोदरदेखील पुरस्कार मिळविले आहेत. या यशाबद्दल तिचे करंजी गावासह परिसरातून अभिनंदन होत आहे.

हा ढवळपुरी येथील आश्रमशाळेचा विद्यार्थी आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त पारनेर तालुक्यातील ढवळपुरी येथील कार्यक्रमांत ग्रीन सेल्फी पुरस्कार (वृक्षलागवड करतानाचा फोटो) या स्पर्धेत त्यास पुरस्कार मिळाला. या वेळी

राजाराम वाघ यांच्या मार्गदर्शनात तुषार रोपांची लागवड करतो. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. सईद काझी, सचिव रेहान काझी, मुख्या. मोहन टकले, बापूसाहेब रुपनर, ग्रामस्थ व शिक्षकांनी तुषार याचे अभिनंदन केले आहे.

## ाजरा

ा व्यसनमुक्ती
ा. दीपक गर्जे,
डगे, दहिफळे
वाडी सेविका
मुख, अनिता
मदतनीस रेखा
ाधा सांगळे,
तलाठी वाटाडे
अधिकारी डॉ.
टी चेअरमन
डे, पत्रकार
ी, दादासाहेब
दींसह ग्रामस्थ

# घुले महाविद्यालयाच्या वतीने मदतफेरी

**दहिगाव ने :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील लोकनेते मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पूरग्रस्तांच्या मदतीसाठी मदतफेरी काढण्यात आली. कोल्हापूर, सातारा व सांगली भागात अतिवृष्टीमुळे महापूर येऊन हजारो लोक बेघर झाले आहेत. या लोकांना मदत करण्यासाठी माणुसकीच्या नात्याने घुले महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी दहिगाव ने गावात मदतफेरी काढून आर्थिक मदत गोळा केली.



(छाया : अशोक वाघ, दहिगाव ने)

'एक हात मदतीचा, या उपक्रमांतर्गत ही मदतफेरी काढण्यात आली. दहिगाव ने येथील बसस्टॅण्ड व मुख्य पेठेतून मदतफेरी काढून आर्थिक मदत गोळा करण्यात आली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. एन. वाबळे, प्रा. नीलेश खरात, अक्षय काळे, महेश शेजूळ, डॉ. राजेंद्र नाबदे, रवींद्र गायकवाड, अप्पासाहेब खंडागळे, दीपक देवकर, अमोल गायकवाड, संतोष बावणे, डॉ. अश्विनी देशमुख, बाळासाहेब नीळ, अरविंद शिंदे, बाबासाहेब घुले, आदींसह विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठया संख्येने सहभागी झाल्या होत्या.

## सीलवर आंदोलन



पत्रकार
नानासाहेब
चेडे

लोकमत

# पूरग्रस्तांसाठी घुले पाटील महाविद्यालयाची मदत फेरी

दहिगावने : शेवगाव तालुक्यातील दहिगावने लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'एक हात मदतीचा' या उपक्रमांतर्गत पुरग्रस्थांना मदत व्हावी म्हणून मदत फेरी काढण्यात आली होती. गावातील मुख्य पेठेतून काढण्यात आलेल्या या मदत फेरीला ग्रामस्थांनी उस्फूर्त प्रतिसाद देत रोख स्वरुपात मदत दिली. जमा झालेला निधी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यालयामार्फत पूरग्रस्तांना पाठविला जाणार असल्याची माहिती कार्यक्रम अधिकारी प्रा. निलेश खरात यांनी दिली. कार्यक्रमासाठी प्राचार्य डी. एन. वाबळे, अक्षय काळे, प्रा. महेश शेजूळ, प्रा. राजेंद्र नाबदे, प्रा. बाप्पासाहेब खंडागळे, दीपक देवकर, अमोल गायकवाड, संतोष बावणे, अश्विनी देशमुख, बाळासाहेब नीळ, अरविंद शिंदे, बाबासाहेब घुले आदींसह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

Ahmednagar Main
Page No. 2 Aug 25, 2019
Powered by: erelego.com

लोकमत

केंद्र सरकारचा निर्णय : अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा नोंदवून होणार दंड

# दिव्यांगांना अपमानास्पद वागणूक दिल्यास कारावास

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : दिव्यांगांना सन्मानाने जीवन जगण्याबरोबरच त्यांच्या हक्क आणि अधिकाराचे संरक्षण व्हावे यासाठी दिव्यांगांना मूळ प्रवाहात समाविष्ट करण्यासाठीचे अनेक कायदे अस्तित्वात आहेत. असे असले तरी अनेक ठिकाणी संस्था, वसतिगृहे तसेच कामाच्या ठिकाणी दिव्यांगांना अनेकविध मार्गांनी दुर्लक्षित केले जाते, प्रसंगी त्यांची अवहेलनाही होते. या प्रकारास आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने नवा कायदा केला असून त्यामध्ये दिव्यांगांना अपमानास्पद वागणूक अथवा त्रास दिल्यास कारावासाच्या शिक्षेची तरतूद केली आहे.

समाजात वावरत असताना दिव्यांग व्यक्तींना अनेक अडचणी आणि समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्यावरील अन्याय तसेच त्यांना होणारा त्रास प्रत्येकवेळी समोर येतोच असे नाही. दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या संस्था, संघटनांच्या माध्यमातून काही प्रकरणे उजेडात येतात आणि तात्पुरती कार्यवाहीदेखील होते. परंतु कायद्यानेच या साऱ्या प्रकारांना आळा बसावा, यासाठी केंद्राने दिव्यांगांसंदर्भात घेतलेला निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

केंद्राने केलेल्या कायद्यानुसार प्रतिकूल जीवन जगणाऱ्या दिव्यांगांना यापुढे कोणत्याही प्रकारचा शारीरिक अथवा मानसिक त्रास दिला तर यापुढे अशी वागणूक देणाऱ्यांवर अ‍ॅट्रॉसिटी अ‍ॅक्टच्या कायद्यानुसार शिक्षा होणार आहे. या कायद्यानुसार गुन्ह्याची नोंद आणि प्रसंगी दंडात्मक कारवाई आणि सहा महिने ते पाच वर्ष शिक्षा ठोठावण्याची तरतूद कायद्यात आहे. त्यामुळे अपंगांच्या प्रश्नांवर काही प्रमाणात तरी न्याय मिळू शकेल, असा आशावाद व्यक्त केला जात आहे.

अनेक ठिकाणी अपंगांना अपप्रवृत्तींकडून मिळणारी वागणूक, समाजघटकाकडून होणारी अवहेलना, दुर्लक्ष करणे, प्रसंगी शारीरिक आणि मानसिक त्रास होईपर्यंतची परिस्थिती निर्माण करणे अशा अनेक तक्रारींचा ओघ सातत्याने होत आहे.

## नोकरी व्यवसायात : नवीन संधी



अलीकडच्या काळात तर यासंदर्भातील तक्रारींची संख्या वाढली आहे. धमकी देण्यासारखे गंभीर प्रकारदेखील घडत असल्याने केंद्राने यात पुढाकार घेऊन कायद्याला नव्या स्वरुपात आणले असून, कडक शिक्षेची तरतूद केलेली आहे. नव्या कायद्यात दिव्यांगांना शिक्षण, नोकरी तसेच व्यवसायासंदर्भातील नवीन संधी उपलब्ध करून देण्याबाबतचाही समावेश त्यात करण्यात आला आहे.



“ केंद्र सरकारने दिव्यांगां संदर्भात घेतलेला हा धाडसी आणि महत्त्वपूर्ण निर्णय असल्याचे म्हणावे लागेल. यामुळे दिव्यांगांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होईलच, शिवाय त्यांच्यावरील अन्यायाचे प्रमाण कमी होऊन धाकही निर्माण होणार आहे. शिक्षेच्या तरतुदीमुळे दिव्यांगांविषयीच्या अन्यायाला चाप बसणार आहे.

- **बबलू मिर्झा**, दिव्यांग कल्याणकारी संघटना

पुढारी

पत्रकार शंकर मरकड न्युज

# घुले महाविद्यालयात राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धा

**दहिगाव-ने : वार्ताहर**

सहकारमहर्षी स्व. मारुतरावजी घुले पाटील यांच्या जयंतीनिमित्त शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ.डी. एन. बाबळे यांनी दिली.

१४ सप्टेंबर रोजी दोन गटात होणाऱ्या या स्पर्धेत अ गटाला अस्वस्थ तरूणाई, लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांचे सहकार व शैक्षणिक क्षेत्रातील योगदान, मंदीचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम तर ब गटात सावधान, लोकशाहीत निष्ठा स्वस्त होत आहे का? भारतीय शेतकरी व शासनाचे धोरण, सोशल मीडिया - मी आहे नेहमी ऑनलाईन असे सद्यस्थितीवर आधारित वकृत्व स्पर्धेला विषय ठेवले आहेत. राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांच्या एका गटाला स्पर्धेत सहभागी होता येणार असून एक विद्यार्थी अ तर दुसरा ब गटातील स्पर्धेतील विषयावर १० मिनिटाच्या वेळेत केवळ मराठी भाषेतून दिलेल्या विषयावरच सादरीकरण करू शकेल. तसेच प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक विजयी संघाला रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र तर तीन उत्तेजनार्थ बक्षीसेही देण्यात येणार असल्याची माहिती स्पर्धा समिती प्रमुख प्रा.डॉ. निलेश खरात यांनी दिली.

My Ahmednagar Edition
12 Sep, 2019 Page No. 2
Powered by : erelego.com

सकाळ

# डॉक्टर, शिक्षक, ग्रामसेवकांना दणका

## गावातच मुक्काम : बोगसगिरी बंद, ग्रामसभेचा ठराव सक्तीचा

**सांगली, ता. ११ : सरकारी शाळा, रुग्णालय आणि ग्रामपंचायत म्हणजे 'धर्मशाळा', अशी अवस्था झाली आहे. या व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी डॉक्टर, शिक्षक आणि ग्रामसेवकांना नोकरीच्या गावातच मुक्कामाची पुन्हा एकदा सक्ती करण्यात आली आहे. याआधीही सक्ती होती; मात्र यावेळी ग्रामसभेने ही मंडळी गावातच राहतात, असा ठराव करून द्यायचा आहे. तो नसेल तर प्रशासकीय शिस्तभंगाच्या कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.**

राज्य शासनाचे अवर सचिव प्रियदर्शन कांबळे यांनी याबाबतचा नवा आदेश जारी केला आहे. तो प्राथमिक शिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, आरोग्य अधिकारी, आरोग्य सहायक यांच्यासाठी लागू होणार आहे. ग्रामीण व्यवस्थेत अत्यंत महत्त्वाचे घटक असलेल्या या मंडळींसाठी हा मोठा झटका मानला जातोय. कारण, जवळपास ८० टक्क्यांहून अधिक लोक मुक्कामी नाहीत. ते तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी राहतात. त्याला मुख्य कारण 'मुलांचे शिक्षण', असे दिले जाते. सरकारी कर्मचाऱ्यांच्या मुलांनी शिकू नये, इतकी वाईट अवस्था सरकारी शाळांची आहे, असेच या व्यवस्थेतील मुख्य घटकांनी कबूल केले आहे.

> **जिल्हा परिषदेकडील डॉक्टर, शिक्षक, ग्रामविकास अधिकाऱ्यांनी मुक्कामी असल्याबाबतचे ग्रामसभेचे ठराव दर तीन महिन्यांच्या ग्रामसभेतून आले पाहिजेत. ते आले नाहीत किंवा बनावटगिरी केली तर प्रशासकीय शिस्तभंगाची कारवाई केली जाईल.**
>
> **- अभिजित राऊत,** सीईओ, जिल्हा परिषद

या मंडळींना याआधीही कामाच्या ठिकाणी मुक्कामी राहावे, असे आदेश होते. ते ती पाळत नव्हते. सरपंचांचा खोटा दाखला ते सादर करायचे. शासन आणि गावच्या डोळ्यात ती एकप्रकारे धूळफेक होती. त्याबाबत बराच खल करून राज्य शासनाने नवे धोरण जाहीर केले आहे. ही व्यवस्था उत्तम चालवण्यासाठी या मंडळींनी मुक्कामी राहण्याची आवश्यकता असल्याचा मुद्दा सन २०१७-१८ सालच्या अनुपालन अहवालात नमूद करण्यात आला होता. त्यादृष्टीने विचार सुरू होता. त्यावर आता शिक्कामोर्तब झाले आहे.

अत्यंत महत्त्वाचे आहे A/G[भाऊ]

Sangli, Main
12/09/2019 Page No. 4

# जीवन जगण्याची कला आत्मसात करा - नरेंद्र घुले

## चिलेखनवाडी येथे विविध महाविद्यालयांच्या श्रमसंस्कार शिबिरास प्रारंभ



नेवासा तालुक्यातील चिलेखनवाडी येथे विविध महाविद्यालयांच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिरात मार्गदर्शन करताना माजी आमदार नरेंद्र घुले. व्यासपीठावर माजी आमदार पांडुरंग अभंग व इतर.

कुकाणा (वार्ताहर) - स्पर्धेच्या काळात संघर्ष अटळ आहे. महामानवांच्या जीवन चरित्रातून आपल्याला संघर्षाची प्रेरणा मिळते. संघर्षातून मिळालेले यश चिरकाल टिकते. कोणतेही कार्य करण्यासाठी धाडस लागते. जीवन अनमोल आहे. ते समाजासाठीही उपयोगी पडले पाहिजे. व्यक्तिमत्व सर्व गुणसंपन्न घडविण्यासाठी वेळ द्या. संपत्तीपेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे. विद्यार्थांनी महाविद्यालयीन जीवनातच जीवन जगण्याची कला आत्मसात करावी, असे आवाहन ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे प्रमुख मार्गदर्शक माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील यांनी केले.

नेवासा तालुक्यातील चिलेखनवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजन, जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, भेंडा लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय, दहिगावने व मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालय अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने सक्षम युवा समर्थ भारत, एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमांतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार पांडुरंग अभंग होते.

व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष काशिनाथ नवले, ज्ञानेश्वरचे संचालक डॉ. नारायण म्हस्के, उद्योजक बी. डी. पुरी, ज्ञानेश्वरचे सरव्यवस्थापक काकासाहेब शिंदे, प्रशासकीय अधिकारी दिनकरराव टेकणे व के. वाय. नजन हे उपस्थित होते. चिलेखनवाडीचे सरपंच प्रा. भाऊसाहेब सावंत यांनी स्वागत केले. प्रा. रामदास आर्ले यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमास उपसरपंच नाथा गुंजाळ, वडुलेचे सरपंच दिनकर गर्जे, ग्रामविकास अधिकारी बी. डी. गोरे, अंतरवालीचे सरपंच संदीप देशमुख, सेवा सोसायटीचे माजी अध्यक्ष भाऊसाहेब सावंत, शेषराव भातंबरे, सूर्यकांत पाडळे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इम्रान शेख, अनिल दुकळे, सचिन वाघमोडे, काकासाहेब गायकवाड,, सुभाष सावंत, प्राचार्य डी. एन. वाबळे, प्राचार्य टी. एम. वराट, डॉ. आर. आर. सासवडे, प्रा. रमेश नवल, बाजीराव कांबळे, प्रल्हाद कांबळे, कार्यक्रम अधिकारी नीलेश खरात, प्रा. रामदास आर्ले व सुभाष काळे उपस्थित होते.

प्रा. मोहिनी साठे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संजय मेहर यांनी आभार मानले.

पुण्यनगरी दि.१२ जानेवारी २०२०

पत्रकार अशोक वाघ



# युवकांनी श्रमदानाचे महत्त्व जाणल्यास गावे समृद्ध : अॅड. देशमुख

**दहिगाव ने :** राष्ट्रीय सेवा योजना शिबिरामुळे सामाजिक प्रश्नांची जाणीव होऊन गावाला विकासाची प्रेरणा मिळते. युवकांनी श्रमदानाचे महत्त्व जाणल्यास गावे स्वावलंबी व समृद्ध होतील, असे प्रतिपादन लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक अॅड. देसाई देशमुख यांनी केले. चिलेखनवाडी, ता. नेवासा येथे सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना, जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय, भेंडे, लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय दहिगावने व मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालय, अहमदनगर यांच्या विद्यमाने आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिरात अध्यक्षपदावरून ते बोलत होते. व्यासपीठावर घुले पाटील ज्ञानेश्वर सह. साखर कारखान्याचे संचालक प्रा. नारायण म्हस्के, सरपंच प्रा. भाऊसाहेब सावंत, उद्योजक बजरंग पुरी, प्राचार्य डी. एन. वाबळे, उपप्राचार्य डॉ. रमेश नवल उपस्थित होते. शिबिरात ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, पथनाट्य, कीर्तन, ग्राम सर्वेक्षण, महिला सबलीकरण आदी उपक्रम राबविण्यात आले. शिबिरात प्रा.डॉ. रमेश नवल -डिजीटल भारत, प्रा. डॉ.आर. एन. आर्ले -ऊर्जा साक्षरता व संवर्धन, उद्योजक बजरंग पुरी -ग्रामीण उद्योग आणि युवक, जलमित्र सुखदेव फुलारी -जलसाक्षरता, राहुल कावळे -शेती व पाणी व्यवस्थापन, साहित्यिक प्रा. भाऊसाहेब सावंत - ग्रामीण समाज व अंधश्रध्दा, प्रा. डॉ. राजेंद्र नावदे -समाज बांधणीत युवकांचे योगदान, बुथवेल हिवाळे -सोशल मिडिया, प्रा. पी.बी. देशमुख -अंधश्रध्दा समज गैरसमज, काकासाहेब शिंदे -विषमुक्त शेती काळाची गरज, आदी विविध विषयावर मार्गदर्शन झाले. गावातून प्रभातफेरी काढून प्लास्टिक मुक्ती, दारूबंदी, बेटी बचाओ, बेटी पढाओ, या विषयांवर प्रबोधन करण्यात आले. येथील फळरोप वाटिकेस शिबिरार्थींनी भेट देऊन पर्यवेक्षक मधुकर कदम यांच्याकडून कामकाजाची माहिती घेतली.

प्रा. रामदास आर्ले यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमास माजी सरपंच संजय सावंत, उपसरपंच नाथा गुंजाळ, ग्रामपंचायत सदस्य सुहास गायकवाड, अनिता गुंजाळ, सोसायटीचे मा. चेअरमन भाऊसाहेब सावंत, पोलिस पाटील मंगल सावंत, बचत गटप्रमुख भाग्यश्री सावंत, देवीदास सावंत, सूर्यकांत पाडळे, अनिल दुकळे, इम्रान शेख, अनिल भातंबरे, शेषराव भांतबरे, दत्तू भातंबरे, प्रभाकर खंडागळे, सचिन वाघमोडे, संतोष भातंबरे, कैलास सावंत, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ संजय मेहर, प्रा. डॉ. नीलेश खरात, प्रा. सुभाष काळे, प्रा. मोहिनी साठे, प्रा. डॉ. आश्विनी देशमुख, प्रा. पवार, संजय चोपडे, प्रा. दत्तात्रय वाकचौरे, प्रा. डॉ. शरद कोलते, प्रा. विकास कसबे प्रा. डॉ. राजेंद्र नाबदे, प्रा. रवींद्र गायकवाड, प्रा. बाळासाहेब साबळे, प्रा. संतोष बावणे, प्रा. दीपक देवकर, प्रा. बाळासाहेब नीळ, प्रा. महादेव म्हस्के, प्रा. अमोल गायकवाड, प्रा. अप्पासाहेब खंडागळे, प्रा. रामेश्वर वाघमारे, प्रा. अक्षय काळे, प्रा. योगेश लबडे, प्रा. सुनीता गाडेकर व ग्रामस्थ उपस्थित होते. प्रा.डॉ. नीलेश खरात यांनी आभार मानले. सुभाष सावंत यांनी

जाहीर नोटी

आमचे अशिल श्री.भरत मोहन आ
कामगार हॉस्पिटलजवळ, श्रीराम
जि.अहमदनगर यांनी दाखवलेल्या
सांगितलेवरून या नोटीसीने कळविण्य
अशिल श्री.भरत मोहन आछडा हे दि.
सकाळी ११ वाजेच्या दरम्यान बस
जात असताना त्यांच्या ताब्यात अ
वत्सलाबाई ऊर्फ यमुनाबाई गंगाधर
०६/२०१५ रोजी श्री.ज्ञानेश्वर आनंदरा
नोंदवून दिलेले मूळ खरेदीखत दस्त
सूची-२ मूळ पावतीसह गहाळ झालेले
आनंदराव गायकवाड यांनी दि.२८/०
सुरेखा भाऊसाहेब थेटे यांना नोंदवून दि
दस्त क्र.३४२९/२०१५, सूची-२ मू
झालेले आहे. त्याबाबत श्रीरामपूर श
गहाळ झालेबाबत अर्जही दिलेला आ
व सूची-२ मूळ पावत्याचा कोणताही
कोणास सापडल्यास खालील नमूद प
आत आणून द्यावे, ही नोटीस दिली अ
श्रीरामपूर अशिला
दिनांक ११/०१/२०२० अॅड.विनो
४० मिनी स्टे
श्रीरामपूर,
मो. ९२

पत्रकार शंकर मरकड न्युज

पुढारी

# सुसंस्कृत नेतृत्व : डॉ. क्षितिज घुले



डॉ. क्षितिज घुले

लोकनेते स्व. मारुतराव घुले पाटील यांच्या दूरदृष्टीने शेवगाव-नेवासे तालुक्यांचा कायापालट झाला. त्यांनी सहकारी तत्त्वावर साखर कारखाना उभारला. जायकवाडीतील पाण्याचा खुबीने व हकाने वापर करून घेत परिसर बागायती केला. सेवा सोसायट्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पीककर्ज दिले. त्यामुळे या तालुक्यांतील शेतकरी सधन झाला. दिवंगत घुले यांचे चिरंजीव माजी आमदार नरेंद्र घुले व चंद्रशेखर घुले यांनी स्व. घुले पाटलांचा आदर्श कामांचा वसा खंबीरपणे चालवला आहे. घुले घराण्यातील सुशिक्षित, सुसंस्कृत युवा नेतृत्व म्हणजे डॉ. क्षितिज नरेंद्र घुले पाटील. एक प्रतिभावान व्यक्तिमत्व.

घराण्यातील तीन व्यक्तींनी आमदार पद भूषवले. त्याच्याच काळात तीन तालुक्यांची दुष्काळी ओळख पुसली. कारखाना, पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आपल्या भागाला न्याय देण्याच काम स्व. घुले पाटलानंतर त्यांचे चिरंजीव नरेंद्र पाटील व चंद्रशेखर पाटील आणि जिल्हा परिषद अध्यक्षा राजश्री घुले करीत आहेत. त्यांचाच आदर्श घेऊन उच्चशिक्षित असलेले व पारंपारिक राजकीय वारसा लाभलेले डॉ. क्षितिज घुले पदार्पणातच पंचायत समितीच्या माध्यमातून राजकीय पटलावर यशस्वी ठरले. सभापती झाल्यापासून खेड्यातील मूलभूत सोयीची गरजेची पूर्तता करण्याचे काम त्यांनी हाती घेतले. गाव तेथे एस. टी. बस पोहोचविण्याचे काम पहिल्यांदा त्यांनी केले. खेडोपाडीचे रस्ते गावातील अंतर्गत दलित वस्तीतील रस्त्यांची कामे मार्गी लावत दळणवळणाच्या मुख्य प्रश्नांवर प्राधान्याने काम केले. केवळ वर्षभरात स्वच्छ भारत योजनेंतर्गत शेवगाव तालुकाच हागणदारीमुक्त केला.

स्व. घुले पाटलांपासून ग्रामीण भागाशी नाळ जोडलेले घुले कुटुंबीय तालुक्याचा एक अविभाज्य भाग आहे. डॉ. क्षितिज घुले यांनीही ग्रामीण भागापासून कामाची सुरुवात केली. सर्वसामान्य जनतेच्या जोरावर दुसऱ्यांदा सभापती होण्याचा मान मिळविला आहे. या युवा नेतृत्वाला लोकोपयोगी कार्यासाठी उदंड आयुष्य लाभो, या वाढदिवसाच्या डॉ. क्षितिजभैयांना लक्ष-लक्ष शुभेच्छा.

शब्दांकन : शंकर मरकड

पत्रकार नानासाहेब चेडे **लोकमत**

# विद्यार्थ्यांनी मैदानी खेळांनाही प्राधान्य द्यावे

## मंदार जवळे : नेत्रतपासणी, मोतीबिंदू शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**दहिगावने :** विद्यार्थ्यांचा मोबाईल व सोशल मीडियाचा वापर मर्यादित हवा. मन आणि शरीर निरोगी राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासाइतकेच महत्व मैदानी खेळांनाही द्यावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मनात न्यूनगंड न बाळगता आपणही मोठ्या पदावर पोहचू शकतो हा आत्मविश्वास स्वत:मध्ये दृढ करावा, असे प्रतिपादन उपविभागीय पोलीस अधिकारी मंदार जवळे यांनी केले.

दहिगावने (ता. शेवगाव) येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक संकुलात पंचायत समितीचे सभापती डॉ. क्षितिज घुले यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्र घुले होते. व्यासपीठावर डॉ. क्षितिज घुले, प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन, सेवा संस्थेचे अध्यक्ष शब्बीरभाई शेख, बाजार समितीचे सभापती अनिल मडके, सरपंच सुभाष पवार, प्राचार्य व्ही. एस. मरकड, माजी सभापती त्रिंबक जाधव, बाळासाहेब धोंडे, भावीनिमगाव सेवा संस्थेचे अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी होते. डॉ. घुले म्हणाले, विद्यार्थी जीवन भविष्याला आकार देत असते.



**दहिगावने येथे आयोजित कार्यक्रमात उपविभागीय पोलीस अधिकारी मंदार जवळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**

या वयात ध्येय निश्चित करून तरुणांनी गगनभरारी घेण्यासाठी जीवाचे रान करायला हवे. एकूण १६५ रुग्णांची नेत्रतपासणी करण्यात आली. ३८ रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले. यांच्यावर अल्पदरात शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

यावेळी कृषीविस्तार अधिकारी रामकिसन जाधव, ग्रामविकास अधिकारी चंद्रकांत जोशी, ग्रामपंचायत सदस्य भरत घोडके, प्रा. संभाजी काळे, प्रा. मकरंद बारगुजे, सोमनाथ सामृत, विष्णू जगदाळे, डॉ. कैलास कानडे, गंगाधर पाबळे, बाळासाहेब पानकर, छायाचित्रकार अरुण अंधारे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. प्रास्ताविक उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे यांनी केले.

Hello Ahmednagar
Page No. 2 Jan 17, 2020
Powered by: erelego.com

दैनिक पुण्यनगरी

दि. ५ फेब्रुवारी २०२०

# सोशलमीडियाचा वापर सावधपणे करा : जवळे



**दहिगाव-नेः** सोशलमीडियाचा वापर अत्यंत सावधपणे करणे आवश्यक आहे, चुकीचे मेसेज आपल्याला गुन्हेगार ठरवू शकतात,त्यामुळे आपल्याकडून चुकीचे मेसेज पुढे जाणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे, असे प्रतिपादन शेवगावचे पोलिस उपनिरीक्षक मंदार जवळे यांनी केले. शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील लोकनेते मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन पारितोषक वितरण समारंभात श्री. जवळे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे होते. या वेळी सरपंच सुभाष पवार, प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन, सेवा सोसायटी अध्यक्ष शब्बीरभाई शेख, ग्रा. पं. सदस्य भरत घोडके, सुरेश घाणमोडे, लक्ष्मणतात्या काशीद , प्रा. मकरंद बारगुजे, पत्रकार अशोक वाघ, शंकर मरकड , किशोर गुंड, बाळासाहेब पानकर, प्राचार्य डी. एन. वाबळे, व्ही. एस. मरकड महाविद्यालय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दीपक देवकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. वार्षिक स्नेहसंमेलनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन ,नाटिका, एकांकिका , गीत गायन अशा विविध स्पर्धात्मक कलागुणांचे सादरीकरण केले. या वेळी विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रा. दीपक देवकर, प्रा.राजेंद्र नाबदे, प्रा. नवनाथ वारुळे, बाळासाहेब नीळ, संतोष बावणे, बाबासाहेब घुले ,नीलेश खरात ,रवींद्र गायकवाड, अरविंद शिंदे, प्रवीण केसभट, श्रीराम देशपांडे, प्रवीण आगळे, विकास थोरात, अमोल गुंड, अमोल गायकवाड, संदीप नलावडे, रामेश्वर वाघमारे, प्रा. सौ.सुनीता ढगे, यशोदा नीळ, सुनीता गाडेकर, सोनाली वांढेकर उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. डी. एन.वाबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.धनंजय घुले व सौ. अश्विनी देशमुख यांनी केले. प्रा. अप्पासाहेब खंडागळे यांनी आभार मानले. या वेळी विद्यार्थी व प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते.

छायाचित्र अशोक वाघ

दैनिक पुण्यनगरी
दि. ५ फेब्रुवारी २०२०

# सोशलमीडियाचा वापर सावधपणे करा : जवळे



**दहिगाव-नेः** सोशलमीडियाचा वापर अत्यंत सावधपणे करणे आवश्यक आहे, चुकीचे मेसेज आपल्याला गुन्हेगार ठरवू शकतात,त्यामुळे आपल्याकडून चुकीचे मेसेज पुढे जाणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे, असे प्रतिपादन शेवगावचे पोलिस उपनिरीक्षक मंदार जवळे यांनी केले. शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील लोकनेते मारुतरावजी घुले पाटील महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन पारितोषक वितरण समारंभात श्री. जवळे प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. अध्यक्षस्थानी उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे होते. या वेळी सरपंच सुभाष पवार, प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन, सेवा सोसायटी अध्यक्ष शब्बीरभाई शेख, ग्रा. पं. सदस्य भरत घोडके, सुरेश घाणमोडे, लक्ष्मणतात्या काशीद , प्रा. मकरंद बारगुजे, पत्रकार अशोक वाघ, शंकर मरकड , किशोर गुंड, बाळासाहेब पानकर, प्राचार्य डी. एन. वाबळे, व्ही. एस. मरकड महाविद्यालय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दीपक देवकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. वार्षिक स्नेहसंमेलनात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन ,नाटिका, एकांकिका , गीत गायन अशा विविध स्पर्धात्मक कलागुणांचे सादरीकरण केले. या वेळी विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रा. दीपक देवकर, प्रा.राजेंद्र नाबदे, प्रा. नवनाथ वारुळे, बाळासाहेब नीळ, संतोष बावणे, बाबासाहेब घुले ,नीलेश खरात ,रवींद्र गायकवाड, अरविंद शिंदे, प्रवीण केसभट, श्रीराम देशपांडे, प्रवीण आगळे, विकास थोरात, अमोल गुंड, अमोल गायकवाड, संदीप नलावडे, रामेश्वर वाघमारे, प्रा. सौ.सुनीता ढगे, यशोदा नीळ, सुनीता गाडेकर, सोनाली वांढेकर उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. डी. एन.वाबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.धनंजय घुले व सौ. अश्विनी देशमुख यांनी केले. प्रा. अप्पासाहेब खंडागळे यांनी आभार मानले. या वेळी विद्यार्थी व प्राध्यापक मोठया संख्येने उपस्थित होते.

छायाचित्र अशोक वाघ

पत्रकार शंकर मरकड

पुढारी

# शालेय जीवनात कलागुण जोपासा

## मंदार जवळे; घुले महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन साजरे

**दहिगाव-ने : पुढारी वृत्तसेवा**

शालेय जीवनातच आपल्या कलागुणांना वाव मिळत असतो. त्याचा फायदा शालेय शिक्षणानंतर भविष्यात निश्चितच होतो. त्यासाठी शालेय जीवनातच कलागुण आत्मसात करावे, असे प्रतिपादन पोलिस उपनिरीक्षक मंदार जवळे यांनी केले.

शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटिल महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषक वितरण समारंभात जवळे बोलत होते. अध्यक्षस्थानी उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे होते.

सरपंच सुभाष पवार, प्रशासकीय अधिकारी के. बाय. नजन, सेवा सोसायटीचे अध्यक्ष शब्बीरभाई शेख, ग्रा. पं. सदस्य.भरत घोडके, सुरेश घाण मोडे, लक्ष्मणतात्या काशिद, प्रा. मकरंद बारगुजे, पत्रकार अशोक वाघ , शंकर मरकड, किशोर गुंड, बाळासाहेब पानकर, प्राचार्य डी. एन. बाबळे, व्ही. एस. मरकड, प्रा. दीपक देवकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शन, नाटिका, एकांकिका, गीत गायन अशा विविध स्पर्धात्मक कलागुणांचे सादरीकरण केले. यावेळी विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ बाबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. धनंजय घुले आणि प्रा. अश्विनी देशमुख यांनी केले. आभार प्रा. अप्पासाहेब खंडागळे यांनी मानले.



**दहिगाव-ने : येथील घुले महाविद्यालयात पारितोषिक वितरण करताना मान्यवर.** (छाया : शंकर मरकड)

# घुले पाटील महाविद्यालयात क्रियाशील उपक्रम - डॉ. कानडे

**बक्तरपूर (वार्ताहर)** - जनता प्रसारक मंडळाच्या लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयात क्रियाशील उपक्रम राबविले जात असल्याने विद्यार्थ्यांना त्याचा निश्चित फायदा होतो, असे प्रतिपादन दहिगाव-ने प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कैलास कानडे यांनी केले.

दहिगाव-ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालयाचे माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थी, पालक, पत्रकार यांना सॅनिटायझर वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डी. एन. बाबळे म्हणाले की, जनता प्रसारक मंडळाला माजी आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील कुशल व अभ्यासू नेतृत्व लाभले असल्याचे सांगून त्यांचे कार्य विशद केले.



दहिगाव-ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय येथे माजी आ. डॉ. नरेंद्र घुले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थी, पालक, पत्रकार यांना सॅनिटायझरचे वाटप करण्यात आले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. कैलास कानडे, सरपंच सुभाष पवार, उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे, प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन, प्राचार्य डी. एन. बाबळे, जिल्हा शिक्षक बँकचे चेअरमन काकासाहेब घुले, ग्रामपंचायत सदस्य भारत घोडके, सुरेश घाणमोडे, पत्रकार शंकरराव मरकड, बाळासाहेब जाधव, अशोक वाघ, प्रा. अप्पासाहेब खंडागळे, प्रा. नीलेश खरात, प्रा. विकास थोरात, प्रा. अक्षय काळे व विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# घुले पाटील महाविद्यालयात क्रियाशील उपक्रम : डॉ. कानडे

## डॉ. नरेंद्र घुले यांच्या वाढदिवसानिमित्त सॅनिटायझरचे वाटप



**बक्तरपूर । वीरभूमी –**

जनता प्रसारक मंडळाच्या लोकनेते मारूतरावजी घुले पाटील महाविद्यालयात क्रियाशील उपक्रम राबविले जात असल्याने विद्यार्थ्यांना त्याचा निश्चित फायदा होतो.असे प्रतिपादन दहिगांवने प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. कैलास कानडे यांनी केले.

दहिगाव-ने येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय माजीआ.डॉ. नरेंद्रजी घुले पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थी, पालक, पत्रकार यांना सॅनिटायझर वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डी. एन. वाबळे म्हणाले की, जनता प्रसारक मंडळाला माजी आमदार डॉ. नरेंद्र घुले पाटील कुशल व अभ्यासू नेतृत्व लाभले असल्याचे सांगून त्यांच्या कार्य विषद केले.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. कैलास कानडे, सरपंच सुभाष पवार, उपसरपंच राजाभाऊ पाऊलबुद्धे, प्रशासकीय अधिकारी श्री. के. वाय. नजन, प्राचार्य डी. एन. वाबळे, जिल्हा शिक्षक बँकचे चेअरमन काकासाहेब घुले, ग्रा. पं. सदस्य भारत घोडके, सुरेश घाणमोडे, पत्रकार शंकरराव मरकड, अशोकराव वाघ, प्रा. अप्पासाहेब खंडागळे, प्रा. निलेश खरात, प्रा. विकास थोरात, प्रा. अक्षय काळे व विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ सोशल डिस्टन्सिंग ठेवत उपस्थित होते.